मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ५४ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून २००३

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## थोडा संयम पाळा : केबल दरवाढ टाळा !

- **सौ. राधा श्रीकांत** (पृ. ३७८), अंधेरी मुंबई. ग्राहक पंचायतच्या क्रियाशील कार्यकर्त्या (फोन २६३०४५२२)

***जाहिरातींचे प्रचंड उत्पन्न असताना फी घेण्याचा हावरेपणा पे चॅनेल्स करतात हे अन्याय्य आहे. फ्री टु एअर चॅनेल्सना प्रक्षेपण निःशुल्क परवडतं, मग यांना का नाही?***

माझ्या बहिणीच्या ७ वर्षाच्या नातवाने कार्टुन नेटवर्क पाहता-पाहता मला विचारलं, ''मावशीआजी, तुझ्या लहानपणी पण टॉम अॅण्ड जेरी होतं?'' ''नाही रे सोन्या, आमच्या लहानपणी टी.व्ही. कुठे होता?'' माझं उत्तर. ''मग शाळेतून आल्यावर किंवा कंटाळा आल्यावर तुम्ही सगळी काय करायचात?''

मी सर्द झाले. या पिढीला टी.व्ही. हे एकमेव साधन झालंय वेळ घालवायला (त्यांच्या भाषेत टाईम-पास) हे मला तीव्रतेने जाणवलं. खरं म्हणजे बोचलंच.

१४ जुलैपासून मुंबई महापालिकेच्या हद्दीत CAS (Conditional Access System) लागू होतेय. Set Top Box शिवाय पे चॅनेल्स पाहता येणार नाहीत. फ्री टु एअर चॅनेल्स मात्र (कमीत कमी ३०) ११० रुपयात पाहता येतील. सेट टॉप बॉक्सची किंमत ४ ते ७ हजार रुपये आणि वर पे चॅनेल्सची फी, इतके पैसे दरमहा खर्च करावे लागतील. आणि हे सगळं फार थोड्या काळासाठी. Convergence Communication किंवा **DTH (Direct to Home) च तंत्रज्ञान आपल्या दारात उभं आहे. ते वापरात आलं की हे सर्व Set Top Box कुचकामी ठरतील. पैसे वाया जातील.**

**अमेरिका, चीन सारख्या देशात जाहिराती दाखवणारे चॅनेल्स फी घेऊ शकत नाहीत. आपल्याकडे मात्र पे चॅनेल्स किती शुल्क घेणार यावर सरकारचा काहीही अंकुश नाही.** एरवी आम्ही अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकून चालतो, मग याच बाबतीत स्वतंत्र बाणा कशासाठी? सेट टॉप बॉक्सची सक्ती करण्यात कुणाचे हितसंबंध गुंतले आहेत?

फक्त फ्री चॅनेल्सच पाहू; पे चॅनेल्स पाहणार नाही असा निर्धार करून थोडी कळ सोसा. पे चॅनेल्स पाहणाऱ्यांची संख्या रोडावली की पे चॅनेल्स नाक मुठीत धरून शरण येतील. पण त्यासाठी हवा दृढ निर्धार आणि संयम - थोड्या काळासाठी.

'केबल हाच श्वास, केबल हाच घास' असं न वागता ''धीर धरी रे, धीरापोटी असती मोठी फळे गोमटी'' हे लक्षात घेऊन वागायला हवं. एक-दोघांनी नाही तर सगळ्यांनी. कारण अन्यायाचा बीमोड संघटन व एकजूट या शस्त्रांनीच करता येतो. ***

### ठाणे येथे मामा मराठे मेमोरियल ब्रिज टुर्नामेंट - १५ जून २००३

ठाण्यातील 'मे यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि.' या सुप्रसिद्ध सराफी व्यवसायाचे संस्थापक यशवंत विठ्ठल उर्फ मामा यांच्या पुण्यतिथीदिनी पारंपारिक पद्धतीने श्राद्ध न करता त्यांचे कुटुंबीय ब्रिजप्रेमींसाठी टुर्नामेंट आयोजित करतात. (पहा शाही ब्रिज टुर्नामेंट, हितगुज जून २०००) चालू वर्षाची टुर्नामेंट **रविवार दि. १५ जून २००३ रोजी सकाळी ९ पासून** लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, ठाणे (प.) येथे होणार आहे.

या 'शाही' टुर्नामेंटमधे सहभागी व्हावे असे सर्वच ब्रिजप्रेमींना वाटते. आपण या वर्षी सहभागी होणार ना? **संपर्क** : आनंद/विलास मराठे, मे यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि., कौपिनेश्वर मंदिराजवळ, स्टेशन रोड, ठाणे (प.) (फोन : २५३३४७३५)

## मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ सभा**

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कोणीहि कुलबांधव कार्यकारी मंडळाला भेटू शकतो.

मागील तिमाहीत ८ मार्च, १२ एप्रिल आणि १० मे रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. ८ मार्चच्या सभेत प्रतिष्ठानच्या आगामी अधिवेशनासंबंधी चर्चा व्हावयाची असल्यामुळे या सभेला श्रीमती सुलभा सुरेश, माहीम, डॉ. सुरेंद्रनाथ गणेश, घाटकोपर, सौ. राधा श्रीकांत, अंधेरी, विश्वस्त डॉ. राजेंद्र विठ्ठल, ठाणे, पुणे शाखा प्रतिनिधी श्री. अरुणराव, जोगेश्वरीचे श्री. पुष्कराज वामन (सपत्निक) हे कुलबांधव-भगिनी खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

१२ एप्रिलच्या सभेत प्रतिष्ठानचे विश्वस्त **डॉ. राजेंद्र विठ्ठल**, ठाणे यांची ओएनजीसीचे जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच डोंबिवलीतले प्रसिद्ध उद्योजक **श्री. मधुकरराव चक्रदेव** यांचा डोंबिवलीतील गणेश मंदिर तर्फे सेवव्रती म्हणून सत्कार करण्यांत आला. त्याबद्दल त्यांचेहि प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन करण्यांत आले.

प्रतिष्ठानचे विश्वस्त **श्री. सतीश मराठे** यांची युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष व प्रबंधक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल कार्य मंडळ सदस्य श्री. यशवंत सुरेश यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांचेशी तासभर झालेल्या अनौपचारिक चर्चेत त्यांनी आर्थिक व बँकिंग क्षेत्रातल्या अनेक प्रश्नांबाबत मौलिक माहिती दिली. विशेष म्हणजे गेल्या दोन-तीन वर्षांपासून जाणवणारी आर्थिक मंदीची परिस्थिती हळुहळु पालटत जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत, हे त्यांचे मत सर्वांनाच आश्वासक भविष्याची आशा लावणारे वाटले.

१० मे च्या सभेत **मिरज येथील उद्योजक रविंद्र बाबुराव** यांच्या ७ मे रोजी अचानक झालेल्या दु:खद निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला.

**पुढील अधिवेशन पुण्यात**

प्रतिष्ठानचे अखिल भारतीय अधिवेशन १९९७ ऑक्टोबरमधे रत्नागिरी येथे मोठ्या थाटामाटांत पार पडले होते. त्यानंतर ५ वर्षे होऊन गेली. पुढचे अधिवेशन कुठे, कधी होणार अशी विचारणा अनेक कुलबांधव अलिकडे करीत होते.

अखेर पुणेकरांनी त्या बाबतीत उचल खाल्ली आणि **२२ ते २४ डिसेंबर २००३ रोजी पुण्यात प्रतिष्ठानचे अधिवेशन घेण्याचे निश्चित केले आहे.** याबाबतचा तपशील पुढील (सप्टेंबर) अंकांत जाहीर करण्यात येईल. तत्पूर्वी आपण या तारखा अधिवेशनासाठी राखून ठेवाव्या यासाठी ही पूर्वसूचना.

तसेच या **अधिवेशनात ज्या कुलबांधवांना** वा त्यांच्या कुटुंबीयांना संगीत, नाट्य, नृत्य, कथा-कविता वाचन-कथन-गायन अथवा अन्य काही **कलाप्रदर्शन करण्याची इच्छा असेल** त्यांनी पुण्यांत श्री. अरुण दत्तात्रय मराठे, १७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुतीजवळ, पुणे ४११०३० (फोन : ४४७३२८९) यांचेशी संपर्क साधावा.

**गुणवत्ता पारितोषिके २००२-०३**

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक/स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

१. **कै. कु. अमिता खांबेटे** पारितोषिके -

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत मराठे परिवारांत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास प्रत्येकी रु. २५०

२. **सौ. सुलभा अनंत** प्रायोजित पारितोषिक -

इ. १०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी रु. १००

३. **प्रभाकर गणेश** प्रायोजित पारितोषिक -

तांत्रिक विषय घेऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी - रु. ५००

४. **कै. जगन्नाथ दामोदर** शिष्यवृत्ती -

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) - वार्षिक रु. २०००

५. **शालिनी धुंडिराज** प्रायोजित वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्माचा प्रचार यांसाठी - वार्षिक पुरस्कार रु. १०००.

६. **विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके, बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज १५ ऑगस्ट २००३ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे**. अर्ज फक्त २००२-०३ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

**अर्जाला जोडून** निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत पाठवावी. नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षिस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.**

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

***



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**डॉ. राजेंद्र विठ्ठल**
**ओ.एन.जी.सी. चे जनरल मॅनेजर**

प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र विठ्ठल (पृ.२९१), ठाणे, यांची तेल आणि नैसर्गिक वायु महामंडळाचे (ओएनजीसी) जनरल मॅनेजर म्हणून नियुक्ती करण्यांत आली. या नवीन जबाबदारीत त्यांना सुयश लाभो अशा मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

**'सेवाव्रती' मधुकर रामचंद्र चक्रदेव**

प्रतिष्ठानचे पूर्वविश्वस्त, डोंबिवली येथील एक प्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते **मधुकर रामचंद्र चक्रदेव** (पृ.७२९) यांचा डोंबिवलीतील गणेश मंदिर तर्फे सेवाव्रती म्हणून सत्कार करण्यात आला. मधुकररावांचे सर्व कुलबांधवांतर्फे अभिनंदन.

**प्रभाकर सीताराम यांचे**
**'श्रीमद्‌भगवद्‌गीतार्थ'**

सांताक्रुझ, मुंबई येथील सभासद **श्री. प्रभाकर सीताराम** (पृ.३२७) यांच्या गीतेचे समश्लोकी भाषांतर 'श्रीमद्‌भगवद्‌गीतार्थ' या पुस्तकाचे प्रकाशन ९ मार्च २००३ रोजी विलेपार्ले महिला संघात ज्योतिर्भास्कर श्री. जयंतराव साळगांवकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. हितगुजच्या या व मागील अंकांत प्रसिद्ध झालेले 'गीताज्ञान नवनीत' हे १२५ श्लोकी गीतेचे सारहि या पुस्तकात परिशिष्ट म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.

**ठाण्यांतील पहिले**
**हिरे मोत्यांचे निर्यातदार अभय मराठे**

वामन शंकर मराठे, ठाणे यांचे नांव सराफी व्यवसायांत अग्रगण्य आहे. गेली ३५ वर्षे ही पेढी आपला नावलौकिक टिकवून आहे. आतां तर त्यांची कीर्ती अभय मराठे (अजित वामन, पृ.२७७) यांनी सातासमुद्रापलिकडे पोचवली आहे. सोने, चांदी, हिरे यांचे अभय मराठे हे ठाण्यातील पहिले निर्यातदार आहेत. जेम अँड ज्वलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल तर्फे ताजमहाल हॉटेलमधे (मुंबईत) आयोजित करण्यात आलेल्या ज्वेलरी प्रदर्शनात त्यांनी आपला व्यापारी स्टॉल उभारला होता. त्याला उत्तम स्टॉलचे पहिले पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

**प्रीता करमरकरला माध्यमिक शिष्यवृत्ती**

फेब्रुवारी २००३ मधे झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ७वी) प्रतिष्ठानची **माहेरवाशीण सभासद श्रुती करमरकर यांची मुलगी प्रीता** (लक्ष्मण शंकर, पृ.५२० यांची नात) हिने ३०० पैकी २४९ मार्क मिळवून ठाणे जिल्ह्यांत १३व्या क्रमांकाने माध्यमिक शिष्यवृत्ती मिळवली. तीन वर्षापूर्वी झालेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतहि (इ. ४थी) तिने घवघवीत यश मिळवले होते. मराठे परिवारातर्फे प्रीताचे अभिनंदन आणि यापुढेहि विविध परीक्षांत असेच सुयश मिळो अशा शुभेच्छा.

**ॲथलिट श्रियाची सुवर्णपदकांची लूट**

ठाणे येथील सभासद **नितीन गोविंद विद्वांस (पृ.६२६) यांची धावपटु मुलगी श्रिया** हिने फेब्रुवारी २००३ मधे कराड येथे झालेल्या **राज्यस्तरीय ॲथलेटीक स्पर्धेत** १४ वर्षाखालील धावण्याच्या ४ x १०० मीटर रिले शर्यतीत २रा क्रमांक घेऊन रौप्यपदक पटकावले. तसेच मुंबई पोर्ट स्पोर्टस् कौन्सिलतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतहि २०० मीटर धावण्यात द्वितीय तर ६० मीटर धावण्यात तृतीय पारितोषिक मिळवले.

ठाण्यातील सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमधे शिकणारी श्रिया विविध स्पर्धांत बक्षिसांची सातत्याने लयलूट करीत आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

१. आर्यक्रीडामंडळ, ठाणे जिल्हा स्तरीय ओपन स्पर्धा - लांब उडी सुवर्णपदक, ४ x १०० मीटर धावणे रिले रौप्यपदक, १०० मीटर धावणे - कास्यपदक

२. श्री मा क्रीडा विहार, इंटर स्कूल स्पर्धा - डिसेंबर २००२ - ४ सुवर्णपदके - लांब उडी, २०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे ४ x १०० मीटर धावणे - रिले.

३. ठाणे जिल्हा ॲमॅच्युअर ॲथलेटिक असोसिएशन स्पर्धा - नोव्हेंबर २००२ - १०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक, रिले (४ x १०० मीटर) धावणे - द्वितीय क्रमांक

४. मावळी मंडळ, ठाणे तर्फे ठाणे शहर आंतरशालेय ॲथलेटिक स्पर्धा - लांब उडी सुवर्णपदक, ४ x ७५ मीटर रिले धावणे - सुवर्णपदक, धावणे ३०० मीटर - रौप्यपदक, धावणे ६० मीटर - रौप्यपदक.

मराठे परिवारातर्फे श्रियाचे अभिनंदन आणि सुवर्णपदकांची घोडदौड अशीच चालू राहो अशा शुभेच्छा!

**जीवेत शरदः शतम्**

मुलुंड, मुंबई येथील सभासद दत्तात्रय आत्माराम (पृ.३२६) यांनी ११ एप्रिल २००३ रोजी ८०व्या वर्षात पदार्पण केले. या वयांतहि ते नित्यनेमाने पोहण्याचा व्यायाम तर करतातच; पण मुलां-मुलींना पोहणे शिकवण्याचे कामहि मोठ्या उत्साहाने करीत असतात. वयस्कांच्या पोहण्याच्या शर्यतीत भाग घेऊन त्यांनी पारितोषिके मिळवल्याचे यापूर्वी हितगुजमधून आपण वाचल्याचे आठवत असेलच.

समाधानी, हसतमुख, आनंदी स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य. हेच कदाचित त्यांच्या उत्कृष्ट आरोग्याचे गमक असावे. त्यांना असेच सुखी व समाधानी दीर्घायुरारोग्य लाभो अशी सर्व कुलबांधवांतर्फे सदिच्छा.

## नांदा सौख्य भरे

१) प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष **सीताराम गोविंद खांबेटे (पृ.६७६) यांची कनिष्ठ कन्या अर्चना** हिचा विवाह देवेंद्र अनंत करंबेळकर, डोंबिवली यांचेशी मुंबईत ११ मार्च २००३ रोजी थाटामाटांत संपन्न झाला. प्रतिष्ठानचे बरेच पदाधिकारी सदस्य वधुवरांत शुभाशीर्वाद देण्यास उपस्थित होते.

२) अहमदाबादमधील सभासद **प्रकाश गणेश विद्वांस यांची कन्या अश्विनी** (पृ.६४५) हिचा विवाह पनवेलचे अमित मुरलीधर जोशी यांचेशी ठाणे येथे २३ मार्च २००३ रोजी थाटामाटाने संपन्न झाला. (चि. अश्विनीच्या JAIIB परीक्षेतील उज्ज्वल यशाची वार्ता मागील अंकांत

Marathe Pratishthan

दिली आहे.)

३) होडावडे जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **लक्ष्मण महादेव यांचा मुलगा महादेव (राजू)** (पृ.४९५) याचा विवाह मोरजी (गोवा) येथील कीर्तिमाला आपटे हिच्याशी होडावडे येथे ३ मे २००३ रोजी थाटामाटाने संपन्न झाला.

४) मिरज येथील कुलबांधव **भास्कर दत्तात्रेय यांचा मुलगा अभय** याचा विवाह नाशिक येथील प्रज्ञा प्रमोद ओक हिच्याशी, ७ डिसेंबर २००२ रोजी नाशिक येथे झाला. तसेच **त्यांची मुलगी राधिका** हिचा विवाह श्रीकांत मधुसूदन बापट यांचेशी १३ मे २००३ रोजी सांगली येथे झाला.

**नवविवाहितांना सुखी व संपन्न जीवन लाभो अशा समस्त मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.**

### सहवेदना

१) प्रतिष्ठानचे आजीव सभासद व दक्षिण महाराष्ट्रातील **उद्योजक रविंद्र बाबुराव** (पृ.४८१) यांचे मिरज येथे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने ७-५-२००३ रोजी निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते.

धडाडीचे उद्योजक म्हणून ते प्रसिद्ध होते. अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर त्यांनी मिरज येथे मराठे इंजिनिअरिंग या नावाने उद्योग सुरू केला. धाडस, अचूक निर्णयक्षमता यांच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच आघाडीचे उद्योजक म्हणून देश-परदेशांत लौकिक मिळवला. अनेक पारितोषिके व सन्मान मिळवले.

ऑगस्ट २००२ मधे मिरज येथे झालेल्या मराठे प्रतिष्ठानच्या विभागीय संमेलनात त्यांनी अतिशय उत्साहाने भाग घेतला होता.

प्रतिष्ठानच्या सांगली केंद्रातर्फे विठ्ठल महादेव, प्रभाकर सदाशिव आणि यशवंत अनंत या सांगलीतल्या कुलबांधवांनी दि. १३.५.२००३ रोजी समक्ष जाऊन त्यांच्या पत्नी श्रीमती अलका मराठे यांच्याकडे सहवेदना प्रकट केल्या.

२) तुळस, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **अच्युत परशुराम मराठे** (पृ.४९९) यांचे २३ फेब्रुवारी २००३ रोजी ६२व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. ***

# स्वातंत्र्यसैनिक प्रभाकर नारायण यांचा तृतीय स्मृतिदिन

- **श्रीपाद नारायण** (पृ.५३८), बेळगांव

***प्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक, बेळगांवनिवासी कुलबांधव प्रभाकर नारायण (पृ.४७५) यांचे २५.६.२००० रोजी वयाच्या ७४व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त त्यांना वाहिलेली ही श्रद्धांजली.***

संस्थानी राजवटीत प्रजापरिषदेतर्फे झालेल्या आंदोलनात त्यांनी सर्वप्रथम भाग घेतला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यांत ते अग्रभागी होते. अनेक वेळा त्यांनी कारावासहि भोगला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी सर्वोदयी चळवळीचे कार्य स्वीकारले. भूदान चळवळीत भाग घेतला. राष्ट्रसेवा दलाचेहि कार्य केले. अनेक सहकारी संस्थांना मार्गदर्शन व मदत केली. हातसडीचे तांदूळ तयार करणाऱ्यांची एक सोसायटी स्थापन करून ३०० महिलांना काम मिळवून दिले. अडीचशेहून अधिक लोकांना सोसायटीतर्फे म्हशी घेऊन दिल्या. तळागाळातील जनतेसाठी रॉकेल, साखर व धान्यवाटपासाठी दुकान सुरू केले. बोगस रेशनकार्डाविरुद्ध मोहीम उघडली. खऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना मानधन मिळावे म्हणून धरणे, उपोषण इ. मार्गांनी प्रयत्न केले.

त्यांनी सूर्यचुलीवर संशोधन करून त्या स्वस्त किमतीत उपलब्ध केल्या होत्या. मराठे प्रतिष्ठानच्या ढवळी, गोवा येथील पहिल्या संमेलनात त्यांनी या चुलीचे प्रात्याक्षिक दाखवले होते.

मी बेळगांवला वार लावून शिकत असता एक वार त्याच्याहि घरी होता. ***

# आण्णा पुतळीबाईच्या कचाट्यातून वाचले

- **मनोज यशवंत** (पृ.४४४), पुणे

***(प्रतिष्ठानचे पुण्यातले कार्यकर्ते यशवंत गजानन यांच्या प्रथम स्मृतिदिनाचे औचित्य साधून त्यांच्या मुलाने केलेले हे पुण्यस्मरण. त्यांच्या परिचयासाठी पहा हितगुज जून २००२ - संपादक)***

''चम्बळचे खोरे'' डाकूंचे निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. चम्बळच्या दोन्ही बाजूस असणारे मातीचे उंच उंच कडे (टिले), अत्यंत दाट अशी बनराई, त्यात काही ठिकाणी असणारा खडक, त्यात लपण्याची सोईस्कर ठिकाणे ह्या सर्व गोष्टी दरोडेखोराना सुरक्षा प्रदान करतात. उंचीवरून बघितल्यास नदीकाठचा किंवा जमिनीवरील माणूस कोठे निसटला हे लक्षातही येत नाही.

माझे आजोबा ग. ह. मराठे नोकरीनिमित्त ग्वाल्हेर जवळील भागातच राहिले. अगदी खेड्यापाड्यात त्यांच्या बदल्या होत असत. त्यावेळी डाकू 'मोहोरसिंग', 'माधोसिंग', 'पुतळीबाई' ही तीन नावे प्रत्येकाच्या हृदयाचा थरकाप उडवीत असत. त्यातलाच एक प्रसंग अंदाजे ५० वर्षांपूर्वीचा.

ग्वाल्हेरजवळ अगदी आतील बाजूस ''भितरवार'' नावाच्या एका अत्यंत लहान गावांत आजोबा रहात होते. आजी सरस्वतीबाई मात्र मुलांच्या शिक्षणानिमित्त ग्वाल्हेरला रहात असे. उन्हाळ्यातील सुट्यांमध्ये आण्णा (यशवंत गजानन, पृ.४४४) व इतर भावंडे आजोबांकडे भितरवारला जात. गावातील कुटुंबे सधन होती. शेतीवाडी, धान्याने भरलेल्या कणग्या गुराढोरांनी भरलेले गोठे, बायकांच्या अंगावरील जडजवाहिर असा एकूण गावाचा चेहरा मोहरा होता. गावातील ''मुखिया''चे घर (याला गढी म्हणत) व आजोबांचे घर ही दोन्ही समोरासमोर होती. मध्ये ६०-७० फुटांची मोकळी जागा होती.

तो सोमवारचा दिवस होता. आजी, आजोबा दोघेही सोमवारचा उपवास करत असत. संध्याकाळी आजोबा स्नान करून संध्या व नित्यपाठास बसले होते. उन्हाळ्यातील दिवस होते. 'मे' महिना असल्याने सूर्यास्तानंतरही सारे



Marathe Pratishthan

गरम रहाते. गरम वारे सतत वाहात असतात. माझे आण्णा त्यावेळी १५-१६ वर्षांचे होते. आजोबांनी ठाकुर जमातीतील एका मुलास सांभाळले होते. तोच आजोबांबरोबर नोकरीच्या गावी रहायचा. त्यांचे स्वयंपाकपाणी व इतर सर्व व्यवस्था तोच बघत होता. त्याचे नाव 'रघुवीर'.

उपवास म्हणून संध्याकाळी रघुवीर स्वयंपाक करत होता. उन्हाळा असल्याने गच्चीवरच तीन विटा मांडून चुलीवर त्याने आपल्या स्वयंपाकाची सोय केली होती. तेथेच आजोबांची संध्या व आण्णांचे रघुवीरला मदत करणे चालू होते. सुमारे १ तासाने स्वयंपाक पूर्ण होऊन रघुवीरने जेवणाची तयारी केली. 'खाना खाने चलो' असे त्याने आजोबांना सांगितले.

तोच समोरील मुखियाच्या 'गढीतून' स्त्रियांच्या रडण्याचा ओरडण्याचा आवाज येऊ लागला. 'अरे मर गई रे, लुट गई रे' अशा किंचाळ्या ऐकू येऊ लागल्या. १५-२० घोडेस्वारांच्या टापांचा आवाज ऐकू आला. संपूर्ण गावाला व मुखियाच्या 'गढीला' चारी बाजूंनी दस्युराणी ''पुतळी'' व तिच्या ''गिरोहने'' वेढल्याचे लक्षात आले.

बायकांच्या अंगावरील जडजवाहिर ओरबाडले जात होते. केस धरून बायकांची फरपट होत होती. त्यांची अवहेलना होत होती व हे भयानक दृश्य सारे गाव थिजलेल्या डोळ्यांनी पहात होते. काही बायका नजर चुकवून गवताच्या गंजीत लपल्या. टोळीतील लोकांच्या लक्षात आल्यावर गवताच्या गंजीला आगी लावण्यात आल्या, बिचाऱ्या बायका होरपळत बाहेर आल्या.

त्यातील एका पुरुषाने हिमतीने एका हातात कंदील तर दुसऱ्या हातात भरलेली बंदुक घेतली आणि रागाने ओरडत तो माणूस गच्चीवर जाऊन मुंढेरीवर (कठड्यावर) उभा राहिला. आता आण्णा जोरात ओरडले 'अरे भैय्या नीचे उतरो तुम्हारे एक हाथमे लालटेन है वो डाकेवाले नीचेसे सबसे पहले तुम्हे निशाना बनायेंगे. या तो लालटेन बुझा दो या तुम नीचे उतरो'

आण्णांचे ओरडणे ऐकून तो माणूस खाली उतरला. पण खालील काही लोकांचे लक्ष आजोबा, आण्णा व रघुवीरकडे गेले. आता हे तिघेही गच्चीवर पालथे पडून राहिले. कारण दोन्ही बाजूने जोरदार गोळीबार सुरू झाला होता. गोळ्यांचा मारा आमच्या डोळ्यासमोरून होत होता असे आण्णा सांगत.

मनात देवाचे नाव घेत तिघांनी अशा अवस्थेत अंदाजे ३ तास काढले. उन्हाळ्यामुळे गच्च्या तापलेल्या होत्या. सर्वांगाला चटके बसत होते. पण जीव वाचवण्यापलीकडे कशाचाही विचार मनात नव्हता.

अखेर मुखियाच्या गढीतील सर्व माल लुटला गेला. पुरुषांनाही बेदम मारहाण झाली. जाताना डाकूंनी गावात आगी लावल्या. संपूर्ण गावांत नीरव शांतता होती. लोक सुन्नपणे बसून होते. कसला उपवास व कसले जेवण! ती रात्र केव्हा संपते असे सर्वांना झाले होते!!

***

# ।। गीताज्ञान नवनीत ।।

*(मागील अंकातील लेखाचा उत्तरार्ध)*

***गीतेतील मुख्य तत्त्वज्ञान, जे सामान्य संसारी माणसाच्या जीवनात उत्तम तऱ्हेने मार्गदर्शक होईल तेवढेच, थोडक्यात पण सोपपत्तिक पद्धतीने शंभरएक श्लोकांत ओवावे असे मनांत आले. त्याचा विस्तार १२५ श्लोकांपर्यंत वाढला.***

***गीतासाराचे हे नवनीत हितगुजच्या सुविद्य, सूज्ञ व जिज्ञासू वाचकांपुढे ठेवण्यांत मला आज विशेष आनंद होत आहे. वाचकांनी या नवनीताचे परीक्षण करून त्यांत व्याकरण-दृष्ट्या काही दोषस्थळे दिसल्यास ती किंवा मजकुरासंबंधी काही उपयुक्त सूचना असल्यास त्या जरूर कळवाव्या. - प्रभाकर सीताराम (पृ.३२७), सांताक्रुझ, मुंबई***

[१४] कर्मयोग व संन्यास नसती फार वेगळे ।
पाही एकच त्यांना जो म्हणावा ज्ञानी तोच तो ।।५५।।

कर्मयोग व संन्यास मोक्षदायीच ते उभें ।
परी उभयामध्ये या कर्मयोग बरा असे ।।५६।।

संन्यास काम्यकर्मांचा कर्मयोगीहि तो करी ।
करता नियतकर्मे तो फलसंन्यासहि करी ।।५७।।

तैसाहि जरी संन्यासी गृहसंसार त्यागी तो ।
कार्य बोधन लोकांचे तरी कर्म करीच तो ।।५८।।

बाल्यापासून संन्यासी शंकराचार्य आदि जे ।
सतत राहिले कार्यीं रत धर्मप्रसारीं ते ।।५९।।

संन्यासी कर्मयोगींना उभयांना अवश्य ते ।
लोककार्य नियत जे कर्म कार्यच होइ ते ।।६०।।

[१५] कर्मयोगांत मोठेच कर्मबंधन संकट ।
कर्मामुळे इन्द्रियांचा होई विषयसंग तो ।।६१।।

होई संगामुळे काम कामापासून क्रोध तो ।
क्रोधाने होई सम्मोह सम्मोहाने स्मृतिभ्रम ।।६२।।

बुद्धिनाश भ्रमाने तो अंती जो सर्वनाशक ।
साखळी सर्व नाशाची कर्माने उद्भवी अशी ।।६३।।

त्यजिती गृहसंसार यतिसंन्यासी त्यामुळे ।
सुटती काम्यकर्मे त्यां ज्ञानसाधन मोकळे ।।६४।।

नसे संसार-संन्यास सर्व लोकांस शक्य तो ।
सर्व होतील संन्यासी समाजक्षय होइ तो ।।६५।।

संन्यासीस मिळे भिक्षा गृहस्थीच्या गृहांतच ।
शिक्षणा ब्रह्मचारींच्या गृहस्थीच करीतसे ।।६६।।

गृहस्थाश्रम आधार समाजाचाच तो असे ।
विना गृहस्थी चाले ना समाजीं धर्मकार्य ते ।।६७।।

म्हणूनी गृहस्थीधर्म श्रेष्ठ सर्वाश्रमांत हा ।
म्हणून कर्मयोगाला कृष्णाने श्रेष्ठ वर्णिला ।।६८।।

[१६] कर्मबंधातुनी मुक्त करता कर्म नेमित ।
युक्ति, कसे रहावे ती, सांगतो कर्मयोगच ।।६९।।

[१४] - श्लोक ५५ ते ६० संन्यास व कर्मयोगाची तुलना गी. अ. ५
[१५] - श्लोक ६१ ते ६८ कर्मयोगांतील धोका, कर्मयोग व गृहस्थाश्रमाचे महत्त्व
[१६] - श्लोक ६९ ते ७२ कर्मयोग गी. अ. २ व ३



Marathe Pratishthan

अधिकारी तू कर्माचा फलाचा न परी कधी ।
होऊ नको फलाशी तू नको निष्क्रियता कधी ।।७०।।

फलाशा संग सोडून करणे नित्य नेमित ।
कर्मे एकाग्रचित्ताने म्हणती कर्मयोग त्यां ।।७१।।

योगाच्या युक्ति न कर्मे करणे संग सोडत ।
सिद्ध्यसिद्धि समत्वाने म्हणती योग त्यासच ।।७२।।

[१७] गृहस्थी कर्मयोग्यास गृहाचा कार्यभार तो ।
असे प्रथम कर्तव्य, करावा नेटकाच तो ।।७३।।

करावी अन्यकर्मे ती यज्ञदानतपादिक ।
यज्ञदानतपःकर्मे योग्याना शुद्धिकारक ।।७४।।

समाजकार्य यज्ञार्थ देशकार्य परार्थ जे ।
करावे कर्मयोग्याने कर्मबंध नसे तया ।।७५।।

कर्मानेहि मिळविली सिद्धि जनकआदिनी ।
लोकसंग्रहप्रीत्यर्थ कर्म योगीस कार्य हि ।।७६।।

लोकसंग्रही कार्ये ही ईश्वराचीच ती जणु ।
करता ती असंगाने परा भक्तीच हो खलु ।।७७।।

[१८] अशी ती कार्यकर्मेहि करावी संग सोडत ।
धरता न फलाशाहि कर्मे होतात सात्त्विक ।।७८।।

अशी यज्ञार्थ सात्त्विक कर्मे पुण्यफलप्रद ।
मोक्षमार्गी पुढे नेती साधून परमार्थ ती ।।७९।।

परंतु पुण्यकर्मे ही करता स्वार्थबुद्धि ने ।
होती राजस ती कर्मे परमार्था न साधती ।।८०।।

परपीडनार्थ ही कर्मे करता दुष्टबुद्धि ने ।
पुण्यकर्मेहि होती ती तामस पापकारक ।।८१।।

[१९] सिद्धीस सर्व कर्मांच्या पांच ही कारणे अशी।
अधिष्ठाने कृति कर्ता करणें दैव पांचवे ।।८२।।

निजास मानी म्हणून कर्ता केवळ मूर्ख तो ।
'करतो मी' अहंकार कर्मयोग्यास तो नको ।।८३।।

[२०] कर्माहूनी असे श्रेष्ठ हेतूची बुद्धि प्रेरणा ।
शुद्धबुद्धि करी पुण्य दुष्ट बुद्धीच पाप ते ।।८४।।

शत्रूवध पुण्यकर्म रणीं जे कृत सैनिकें ।
धनहारी करी हत्या अत्यंत घृणपाप ते ।।८५।।

[२१] जी लोकसंग्रही कार्ये असती पुण्यकारक ।
परी जी परपीडार्थ जाणावी पापकारक ।।८६।।

जाणिले पाहिजे कर्म अकर्म कोण काय ते ।
विकर्म काय? कारणें कर्माची गहना गति ।।८७।।

[२२] पाही अकर्म कर्मांत जो अकर्मांत कर्म ते ।
तो बुद्धिमान लोकीं या योगाने कर्म जो करी ।।८८।।

अकर्म तें जरी मौन नाराजी दाखवी तरी ।
शत्रूहत्या रणीं कर्म, अकर्म होइ, पाप न ।।८९।।

[२३] जैसे करती अज्ञानी कर्म, कामांत सक्त जे।
करावे त्याच जोषाने तरी निष्काम पण्डितें ।।९०।।

कर्मफलाची कामना असे ती मुख्य प्रेरणा ।
करण्या कर्म जोषाने, मिळे सामान्य मानवा ।।९१।।

फलाशा सोडता संग न राही त्यास प्रेरणा ।
जोषाने कर्म करण्या, सामान्य होइ निष्क्रिय ।।९२।।

म्हणून योग कर्माचा सामान्यां होइ दुस्तर ।
स्थितप्रज्ञ स्थितीविना समत्वबुद्धि दुर्लभ ।।९३।।

वासना काम सोडी जो जेव्हां सर्व मनांतल्या ।
संतुष्ट अपुल्या ठायीं आपण, स्थितप्रज्ञ तो ।।९४।।

दुःखाने हो न व्याकूळ सुखाने हो न हर्षित ।
जिंकी रागभयक्रोध स्थितप्रज्ञच तो नर ।।९५।।

सर्वत्र जो अनासक्त परी कर्तव्य जो करी ।
जोषाने कर्मसक्तांच्या त्याची प्रज्ञा प्रतिष्ठित ।।९६।।

ती स्थिति स्थितप्रज्ञेची विना अभ्यास ना मिळे ।
योगाभ्यास नसे शक्य गृहसंसारिला परी ।।९७।।

[२४] म्हणून कथिली विद्या कृष्णाने राजगुह्य ही ।
राजयोगेंच होई जी सुगमा सर्व मानवां ।।९८।।

राजविद्या राजगुह्य योगांचा सर्व राज जो ।
ज्ञानविज्ञानसहित कथिला योगराज तो ।।९९।।

असेहि कर्मयोगाचा राजयोग प्रकार हा ।
जोडता ज्ञान भक्तीने करी दिव्य रसायना ।।१००।।

लागे या राजविद्येला ज्ञान श्रद्धेची पार्श्वता ।
अवश्य जाणणे नाते प्रकृती पुरुषोत्तम ।।१०१।।

परमेश्वर तो धाता पिता माता पितामह ।
जे जे पवित्र व ज्ञेय तोच ओंकार वेदहि ।।१०२।।

निवास पोशिता साक्षी गति आश्रय व प्रभु ।
स्वामी तो सर्व विश्वाचा सर्व काहीहि ईश्वर ।।१०३।।

सर्व भूतांमधे पाही ईश्वराचाच अंश जो ।
होई निर्वैर सर्वांशी सर्वांचे शुभ इच्छि जो ।।१०४।।

मानापमान शीतोष्ण शत्रू मित्र शुभाशुभ ।
सर्वत्र समदृष्टी जो पावे योग समत्व तो ।।१०५।।

कोणताहि असो पेशा जोडावे निजकर्म ते ।
महेश्वराच्या कार्यास जगाचा जो पितामह ।।१०६।।

देवकार्याशी बुद्धीने आरंभां ताडता असे ।
दुर्बुद्धि दुष्ट कर्मांची आपसूकच ती गळे ।।१०७।।

पटे जे शुद्धबुद्धीला करावे कार्य तेच ते ।
आज्ञापिले ते ईश्वरें समजावे जणु असे ।।१०८।।

स्वामीची मानवा आज्ञा मिळे कर्मास प्रेरणा ।
यशायशाची ना चिन्ता फलहि अर्पिताच त्या ।।१०९।।

जयाजय यशायश अर्पावे फल ईश्वरा ।
निमित्त मात्र मानावे निजा, स्वामी प्रयोजिता ।।११०।।

करावे कार्य भक्तीने एकाग्रमति प्रीतिने ।
पणास लावुनी सर्व प्रतिभा बल बुद्धि ने ।।१११।।

मानूनी स्वामी देवास आज्ञा त्याचीच मानता ।
करावे कर्म भक्तीने फलहि अर्पूनीच त्यां ।।११२।।

अशा रितीने करता कर्मे नियत सात्त्विक ।
एकाग्रचित्त बुद्धीने मिळे सुयश निश्चित ।।११३।।

हो असे कर्म संपन्न होई पूजा अनायसें ।
साधता परमार्थाला मोक्षी प्रगति होतसे ।।११४।।

[२५] मारता घण लोहार ऐरणा मानी देव जो ।
अर्पूनी ठिणग्यापुष्पे राजविद्याच आचारी ।।११५।।

वेदध्ययन लागे न तपश्चर्या न घोर ती ।
मोक्षप्रीत्यर्थ जो भक्त राजविद्याहि आचरी ।।११६।।

[२६] संतसखू जनाबाई दळता कांडताच त्या ।
चरता राजविद्या ही गेल्या ब्रह्मपदास त्या ।।११७।।

कर्मठ काम्यकर्मी जे ज्ञानी आचार्य पण्डित ।
नच मुक्ति मिळे त्यांना अश्रद्ध भक्तिहीन जे ।।११८।।

जरी परंतु प्राकृत भावें भक्त अनन्य जे ।
सेना, सावता, गोरा, ते ईशप्राप्तीस पावले ।।११९।।

न मिळे मुक्ति अश्रद्धां कर्मयोगी न होत जे ।
श्रद्धा अनन्यभावाची कर्मभक्तीच मुक्ति दे ।।१२०।।

---

[१७] - श्लोक ७३ ते ७७ कर्मयोग्याने कोणती व कशी कर्मे करावी

[१८] - श्लोक ७८ ते ८१ पुण्यकर्माचे हेतूप्रमाणे ३ प्रकार गी. अ. १४ व १७

[१९] - श्लोक ८२ व ८३ गी. अ. १८ १४ ते १६

[२०] - श्लोक ८४ ते ८६ हेतूप्रमाणे कर्माची प्रत ठरते.

[२१] - श्लोक ८६ पाप पुण्याची सोपी व्याख्या

[२२] - कर्म अकर्म विचार गी. अ. ४

[२३] - श्लोक ९० ते ९७ कर्मयोगाला स्थितप्रज्ञ स्थिति आवश्यक सामान्य माणसाला ती दुस्तर

[२४] - श्लोक ९८ ते ११४ राजविद्या राजगुह्य म्हणेल काय? गी. अ. ९

[२५] - श्लोक ११५ ऐरणीच्या देवा तुला - या गाण्यांतून घेतलेली कल्पना

[२६] - श्लोक ११७ विनोबांच्या गीतेवरील प्रवचनेमधून घेतलेला विचार

Marathe Pratishthan

कृष्णाने पंचसूली ती राजविद्येची सांगिली ।
अंती एकादशाध्यायी संक्षिप्त अर्जुना अशी ।।१२१।।

[२३] मत्परायण नि:संग भक्त मत्कर्म जो करी ।
निर्वैर सर्वभूतीं जो पोहोंचे निश्चयें मला ।।१२२।।

जाणी हे आत्मबुद्धीने भावे परमज्ञान जो ।
आचारी ते, मिळे त्यास योगेश्वर गुरूच तो ।।१२३।।

अभ्यासी राजविद्या ही आचरी जीवनांत जो ।
मोक्षमार्गी पुढे जाई वेंचिता परमार्थ तो ।।१२४।।

जरी न लाभला मोक्ष या जन्मींच नरास वा ।
नेईल राजविद्या ही मोक्षमार्गी पुढेच त्या ।।१२५।।

*समाप्त*

**समर्पण व प्रार्थना**

सार हे ज्ञानगीतेचे वासुदेवे स्फुरविले ।
होता निमित्तमात्रेहि रचिले ते प्रभाकरे ।।१।।

नवनीत ज्ञानगीतेचे अर्पी नवनितप्रियां ।
पुष्टीदायी नरा होवो मोक्षमार्गींच चालता ।।२।।

तत्प्रसादे नरा लाभो आनन्द परमार्थच ।
मोक्षमार्गी नरा लावो तो प्रसादच शान्तिद ।।३।।

---

[२३] -श्लोक १२२ राजविद्येची पंचसूत्री गी. अ. ११

***


**एकमेकां साह्य करूं**

मेकॅनिकल इंजिनियरिंग उद्योगांना लागणारी तांत्रिक माहिती संकलन करून ती Slide Charts च्या स्वरूपांत प्रकाशित करण्याचा व्यवसाय मी गेली ७-८ वर्षे करीत आहे. आजवर ४०हून जास्त निरनिराळ्या विषयांवर असे charts तयार केले आहेत. औद्योगिक प्रदर्शनात भाग घेऊन त्यांचे मार्केटिंग करतो.

निरनिराळ्या उद्योजकांकडे जाऊन या प्रॉडक्टची विक्री करण्यासाठी **आपल्या कुलबांधवांमधून महाराष्ट्र आणि मुंबईसाठी एजंटची नेमणूक करावयाची आहे.** थोडीफार टेक्निकल पार्श्वभूमि असलेल्या व्यक्ती अथवा मार्केटिंग स्किल असलेल्या व्यक्ती यांना विशेष प्राधान्य. **संपर्क** : प्रभाकर त्र्यंबक विद्वांस, मंगलमूर्ती टेक्नो स्लाईडस, २४ हेमेंद्र पार्क सोसायटी, वाटवा रोड, इसनपूर, अहमदाबाद ३८२४४३ (फोन: ५७३०२२२)
e-mail : mangaltechno@rediffmail.com


# गजाआडचे गुणवान : साचो तेरो नाम

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), निवृत्त कारागृह अधीक्षक, पुणे.

***येरवडा मध्यवर्ती कारागृहात सांस्कृतिक विभागाचा प्रमुख म्हणून मी काम करीत होतो. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन जवळ आलेला. त्या दृष्टीने माझी कार्यक्रमांची जुळवाजुळव चालू होती. गाण्यांत, वादनांत, नाट्य छटांत भाग घेवू इच्छिणाऱ्या बंदींची तिथे गर्दी झाली होती. हे सर्व चालू असतानाच मी माझ्याकडे आलेले नाव पुकारले. ''भीमा जाधव'', आणि भीमा जाधव पुढे आला.***

अंगावर चट्ट्यापट्ट्याचा, जरा आखूडच पायजमा, वर गुलाबी शर्ट, त्यावरहि काहीतरी भडक नक्षीकाम, खूप केस वाढलेले. मी मनांत म्हटलं, हा आता बहुतेक सिनेगीतासाठी नाव देणार. म्हणून मी नाराजीनेच विचारले, ''काय भीमा, कोणतं गाणं म्हणणार?'' तो सीनेगीत म्हणणार, हे गृहीत धरुन मी थट्टेनंच म्हणालो, अरे, ''तू भीमा म्हणजे भीमसेन जोशी सारखं शास्त्रीय संगीत म्हटलं पाहिजेस,'' माझे सहकारीही यावर हसले. पण... भीमाचे उत्तराने आम्ही सर्वजण चक्रावलो. तो म्हणाला, ''हो, साहेब मी शास्त्रीय संगीत गाणार आहे. मी बैरागी भैरव राग म्हणेन.''

त्याने कोपऱ्यातला तानपुरा उचलला. त्याला नमस्कार करुन तो सूर लावू लागला. तबलजी बंदीनेही ताल धरला. पेटीवाला बंदीही तयारीत राहिला. भीमाने खर्जामधून सूर लावला, वातावरण तयार झाले. बैरागी भैरव मधील 'साचो तेरो नाम' ही चीज सुरू झाली. ......जवळपास ४० मिनिटे भीमा गात होता, ताना मारत होता. सुरेख आणि सुरेल आवाज लाभला होता त्याला. आमचे सर्वांचे आग्रहाखातर त्याने आणखी एक राग आळवला आणि नंतर आम्ही त्या वातावरणामधून बाहेर पडलो.

नंतर मी त्याला एकट्यालाच बोलावून विचारलं, ''भीमा, अरे तू कुठल्या गुन्ह्यामध्ये आलास?'' तो म्हणाला, ''साहेब, माझेवर चोरीचा आरोप होता आणि त्यांत मला साधी कैद झाली आहे. त्याचं असं झालं. मी मूळचा सोलापूरचा. गाणं आणि त्यातून शास्त्रीय संगीत मला खूप आवडायचं. गाणं म्हणजे जणू माझा प्राणच. मी जेमतेम आठवीपर्यंत शिकलो आणि एके दिवशी गाण्याच्या ओढीने घरातून बाहेर पडलो आणि थेट बनारस गाठलं. तिथं एका मोठ्या गायकाकडे गाणं शिकतो आहे. पुण्याला एका मैफली निमित्ताने आलो होते, गाण छान रंगलं. सुमारे १।। वाजता मी तिथेच बैठकीवरच झोपलो. सकाळी अचानक झालेल्या आरडाओरड्यानंच मी जागा झालो. त्यातल्याच एकानं मला विचारलं, ''काय हो, इथली हार्मोनियम कुठे गेली?'' मी म्हणालो, मी तर इथेच आहे; आणि मी इथं अगदी नवीनच आहे. पण माझं समर्थन कोणीच ऐकून घ्यायला तयार नव्हतं. आणि एकमेकांचे साह्यानं माझे विरुद्ध पोलीस तक्रार झाली. पोलीसांनी मला जामीन आणायला सांगितलं. पण कोणीच ओळखीचं नाही. जामीन कोण देणार? एका हवालदाराने सल्ला दिला, ''गुन्हा कबूल कर, पटकन शिक्षा लागेल आणि सुटून जाशील, इथे कशाला सडत पडतोस?'' पूर्ण विचाराने मी सल्ला ऐकला, गुन्हा कबूल केला. चार महिने साधी कैद झाली. मी आता ती भोगतोय. सुटल्यावर परत बनारसला जाईन. सुटायला आता थोडेच दिवस राहिले आहेत.

काहीही गुन्हा न करता केवळ लवकर सुटावे या आशेवर त्याने गुन्हा कबूल केला... मला अतिशय वाईट वाटले. २६ जानेवारीला कार्यक्रम चांगला झाला. भीमाने ''बैरागी भैरव'' राग उत्कृष्ट सादर केला. त्यावेळचे कारागृह महानिरीक्षक संगीतातले चांगले जाणकार होते. त्यांनी भीमाची पूर्ण चौकशी केली व त्यांचे कार्यकक्षेतील नियमानुसार त्याला माफी दिली. तो सुटल्यावर त्याने बनारसपर्यंतचे तिकिटाची सोय केली. मीच त्याला गाडीत बसवून आलो. त्याचे आभाराचे, सुखरूप पोचल्याचे पत्र आले.

अजूनही बैरागी भैरव सुरू झाला की मला भीमाची आठवण येते आणि मी नकळत गुणगुणतो ''साचो तेरो नाम''.

***

Marathe Pratishthan

# दत्तक पालक

- **वसंत रावजी** (पृ.११७), खुडीपाट, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

***मीराने 'हो' म्हणताच रेगेबाईंचा निर्णय ठाम झाला. ''मीरा आता माझी मुलगी झाली. ह्या दुष्ट चक्रातून तिची सोडवणूक झालीच पाहिजे. तरच ज्योतिराव-सावित्रीबाई फुले यांच्या आत्म्याला शांती मिळेल.''***

'नीलकमल आणि पारिजात' या दोन इमारती दिमाखाने उभ्या होत होत्या. दररोज त्यांची वाढ कुंडीतल्या रोपासारखी होत होती. सर्व काम दिवाळीच्या पूर्वीच पूर्ण झाले. दिवाळीच्या नववर्षाच्या दिवशी सत्यनारायणाची पूजा बांधून रहिवाशांच्या हाती त्यांच्या कोऱ्या ब्लॉकच्या चाव्या दिल्या गेल्या. दहा, पंधरा कुटुंबे लगेच रहावयास आली. शिल्लक जूनपासून शाळा चालू होताना येणार होती.

मृग नक्षत्राचा पाऊस सुरू होण्यापूर्वीच एक-दोन चांगल्या सरी पडल्या. नीलकमल, पारिजात, फुलून गेल्या. ११ जूनला शाळा उघडताच सर्व मुले बऱ्याच दिवसांच्या सुटीनंतर पुन्हा अभ्यासाच्या मशीनला जुंपली गेली. काहींसाठी त्या-त्या शाळेच्या बसगाड्या ठराविक वेळी येऊ लागल्या. त्यांचे गणवेश आणि सर्वच बाज काही वेगळाच होता.

बाहेरच्या आऊट हाऊसमध्ये इमारतीची देखभाल करणाऱ्या शंकर माळ्याचे कुटुंब रहात होते.

शंकर माळ्याची लेक मीरा सुद्धा न चुकता शाळेत जाऊ लागली पण म्युनिसिपालिटीच्या. ती पाचवीत होती. अभ्यासाशिवाय आईला आवार झाडण्यात, काही घरातली भांडी घासण्यात मदत करणे हा तिच्या दररोजच्या जगण्याचा एक भाग होता.

एक दिवस शंकर माळी नोटीस घेऊन आला. एकाच मालकाच्या तीन चाळीतील १०५ खोल्या आणि ४० ब्लॉक, अशा सर्व रहिवाशांनी एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करण्याचे ठरविले होते. पहिल्या वर्षी घरटी रु. २५ वर्गणी काढून, साधा उत्सव साजरा करावा, आणि पुढील वर्षापासून जरा जास्त मासिक वर्गणी बसवून उत्सव मोठ्या प्रमाणात करावा असे ठरले होते.

ह्या वर्षीचा गणपती उत्सव पाच दिवस, पूजा, आरती वगैरे नित्याचे कार्यक्रम होऊन पार पडला. एक दिवस प्रोफेसर रेग्यानी कथाकथन केले. मुलांनी गाणी, नाच, नाट्यछटा असे विविध कार्यक्रम करून एक दिवस साजरा झाला.

मुलांच्या कार्यक्रमाच्यावेळी उत्सुकतेने मीरा सर्व पहात होती. तिलाही आपण नाच सादर करावा असे वाटत होते. पण या बड्यांच्या उत्सवात कसा भाग घ्यायचा! तिच्याकडून काही वर्गणी घेण्यात आली नव्हती. तिची चलबिचल प्रोफेसर रेग्यांच्या लक्षात आली. त्यांनी हळूवारपणे विचारले, ''काय गाणार, नाचणार?'' सर्वजण फिदीफिदी हसू लागले. मीराची आईसुद्धा डोळे वटारून पाहू लागली.

परंतु रेगेसर ठाम होते. ''चल, आईला घाबरू नकोस.'' असे म्हणत त्यांनी तिला स्टेजपर्यंत नेले. माईक समोर उभे राहून ते म्हणाले, ''आता मीरा आपणाला नृत्य करून दाखविणार आहे.'' तिच्याकडे वळत त्यांनी विचारले, ''बाळ कसला नाच तू करणार?'' मीरा म्हणाली, ''आमच्या सावंतबाई गेल्या वर्षापासून आम्हा काही मुलींना कथ्थक शिकवतात. ते दाखवू?'' ''वा, फारच छान.'' रेगेसरांनी प्रतिसाद दिला.

समोरची माणसे हसू लागली. ही १२ वर्षाची फाटक्या अंगाची मुलगी काय नाचणार! मीरा झटकन् कपडे बदलून आली. नाचासाठीचा ड्रेस सावंतबाईनीची तिला शिवला होता. पायात चाळ बांधलेल्या मीराने अभिवादन केले आणि तबल्याच्या तालावर ती पावले टाकू लागली. तिचे हावभाव, मुद्रा, पायांची हालचाल पाहून प्रेक्षक आश्चर्य करू लागले. पाच मिनिटांनी वाकून अभिवादन करून मीराने नृत्य संपविले. टाळ्यांचा कडकडाट झाला. मीराच्या आईच्या डोळ्यात कौतुक मावत नव्हते. रेगेसरांनी उत्स्फूर्तपणे तिला १० रुपये बक्षीस दिले.

दुसरे दिवशी संध्याकाळी रेगेसरांनी मीराला मुद्दाम बोलावून घेतले. भीतभीतच मीरा समोर आली. ती गांगरली होती. फ्रॉकचा घोळ बोटाभोवती गुंडाळत ती उभी होती. रेगेसर नॅपकीनला हात पुसत बाहेर आले. ''बेटा बस,'' ते म्हणाले तरीहि मीरा उभीच. त्या गाद्या असलेल्या उंची खुर्चीवर बसावे का? तिचा निर्णय होत नव्हता. पलंगाच्या पायाजवळ ती उभीच राहिली. ''अग बसना, उभी कशाला?'' रेगे पुन्हा म्हणाले. चोरट्या अंगाने ती खुर्चीवर अर्धवट बसली. रेगेसरांच्या डोळ्यातील प्रेमळ भाव तिने वाचले.

''तुला गेल्या वर्षी किती मार्कस् मिळाले?'' ''९२%'', ती म्हणाली, ''मला स्कॉलरशिप सुद्धा मिळते'' तिने आणखी माहिती पुरवली. अभ्यासाबद्दल कुणी विचारपूस केल्यास ती आनंदाने उत्तरे देत असे. स्कॉलरशिप मिळते हे ऐकताच सौ. रेगे सुद्धा लक्षपूर्वक तिच्याकडे पाहू लागल्या. आपण चुकीच्या मुलीला बोलाविले नाही, याची खात्री रेगेसरांना आणि सौ. रेगेंनासुद्धा झाली.

''चल तुझ्या बाबाला भेटू.'' असे म्हणत रेगेसरांनी पायात चपला सरकविल्या. ते तिच्या बरोबर खाली आले. ''शंकर'', त्यांनी हाक मारली. रेगेसाहेब आपल्याला का हाक मारतात हे शंकरला समजले नाही. कुठे घाण राहिली का? वेळेवर पाणी सोडले. फुलझाडांना नियमित सर्व घालतो. छाटणी होते. कशाला बरे बोलावत असतील? बहुधा काहीतरी काम असावे. मनाची समजूत घालत तो रेगेंच्या समोर उभा राहिला. ''साहेब तुम्ही कशाला तसदी घेतली? मीच आलो असतो नव्ह, निरोप पाठविला असता तर''! असे ओशाळपणे हसत तो म्हणाला.

''अरे हे रत्न आहे तुझ्या घरात.'' असे म्हणत रेगेसर मीराकडे वळले. काही उपद्व्याप तर केला नाही ना! अशी शंका येऊन शंकर म्हणाला, ''काय केलं हिन साहेब? तिने केलं काय ते सांगा, जल्माची याद राहील अस करतो.''



Marathe Pratishthan

''तेच सांगण्यासाठी आलो. ऐक, शब्द मात्र मागे घेऊ नकोस. ठरलं! तिच्या अभ्यासाचा, शाळेचा सर्व खर्च यापुढे मी करणार. तिने कुठल्या शाळेत जावं, काय शिकावं, हे मी ठरविणार. तू किंवा तुझ्या नातेवाईकांनी यात लुडबुड केलेली मी खपवून घेणार नाही. तिला आणि तुम्हाला सुद्धा जन्मभर आठवण राहील अशी तिला घडवू या. आहे मान्य?''

शंकर संभ्रमित झाला. असं काही अचानक आपल्यासमोर येईल याची कल्पनाच तो करू शकत नव्हता. काय उत्तर द्याव हेच त्याला सुचेना. पोरगी बऱ्यापैकी अभ्यास करते असे मास्तर म्हणाले म्हणून सातवीपर्यंत शाळेत पाठवायची, त्यानंतर पंधरा-सोळाव्या वर्षी तिचे बऱ्यापैकी पोरगा बघून लग्नाचा बार उडवून द्यावा असा बेत त्याने आणि सर्वांनीच निश्चित केला होता. लई शिकून आपल्या समाजात तिला नवरा कसा मिळणार? शिक्षणाने तिच्या वागणुकीत झालेला बदल आम्हाला, नातेवाईकांना कसा पटणार? कसा समजणार?

आपलं घर, नातेवाईक, कदाचित मी आणि बायकोसुद्धा तिला तुच्छ वाटू लागू. आपल्याशी, नातेवाईकांशी ती फटकून वागेल. आमच्या सवयी, आमची वागणूक तिला आवडणार नाही. आमची तिला लाज वाटू लागेल. ती घरातून पळूनसुद्धा जाईल.

शंकर गप्प झालेला पाहून, रेगेसरांनी विचारले. ''काय, गप्प का झालास शंकर?'' वादळात सापडलेल्या नाविकासारखी त्याची स्थिती झाली होती. त्याने आपल्या बायकोकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. सायबानी हे मधेच काय लफड निर्माण केलं, असे तिचा चेहरा सांगत होता. ''साहेब लई शिकून करणार काय! शेवटी लग्न करून मुलंबाळंच सांभाळणार ना? मग इतक शिक्षण कशापायी घ्यायचं? मी, माझी बायको, तिच्या, माझ्या बहिणी कुठं शिकल्यात? त्यांचे संसार झालेच ना! हिचाबी होईल. सातवीपर्यंत शिकली, लिहा-वाचायला शिकली की झाल.'' त्याचं साधं सोप गणित होत.

रेगे तसे हार मानणारे नव्हते. ''हे बघ शंकर, तू म्हणतोस ते खरं आहे. तुमची पिढी मागची होती. आता पुढच्या पिढीला शिक्षणामुळे बऱ्याच गोष्टी मिळणार आहेत. तुझ, तुझ्या बायकोच काम तुम्हाला कितीसे पैसे मिळवून देत? काय मान मिळतो? तुझ्या मुलानी तसेच कष्ट करून दिवस घालवावे, असे तुला वाटत नसेल. आई-बाप आपल्या मुलांचं सुख पाहतात. शिक्षणामुळे तिला ते मिळू शकेल. माझी बायको शिक्षिका आहे. ती सुद्धा संसार करतेच. तुझी मीरा शिकून असच जीवन जगू शकेल. कदाचित जास्त चांगल.'' त्यांना समजेल अशा भाषेत ते त्याला समजावून देत होते.

''तुम्ही मोठी लोकं, तुम्हाला ते शोभून दिसतं. तुमचा सर्व समाजच तुमच्यासारखा आहे. आमच सारच निराळ. ते तुम्हाला नाही कळायचं.'' शंकर अजून माघार घेण्यास तयार नव्हता.

''आमचा-तुमचा असा फरक तू का करतोस? आम्ही माणसं आणि तुम्ही जनावरं असं तर नाहीना? आम्हाला संधी मिळाली, तुम्हाला मिळाली नाही. म्हणून तुम्ही कायम असच जीवन जगणार? त्यात बदल करणार नाही? आज सुरवात करा, पुढील पिढ्या तुमच्यापेक्षा जास्त सुखी होतील. आमच्या सारख्या होतील.'' रेगेही माघार घेत नव्हते.

शंकरची बायको बाजूलाच होती. त्यानं होकार दिला तरी आपण न्हाई म्हणून सरळ सांगायचं, असा निर्धार तिने मनाशी केला. बाजूला उभी असलेली मीरा, एकदा बाबाकडे, एकदा आईकडे, मध्येच रेगेसाहेबांकडे पाही. बाबांनी हो म्हणावे असे तिला वाटत होते. ती मनातल्या मनात देवाची प्रार्थना करत होती. बरेच आढेवेढे घेत, शंकरने अकरावीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी, रेगेसाहेबांवर टाकण्यास संमती दिली. कौल मीराच्या बाजूने लागला. तिचे समाधान झाले.

रेगे घरी आले. त्यांनी सारी हकिगत बायकोला सांगितली. ''पुढच्या वर्षी अगोदर तिची शाळा बदलतो. विद्यामंदिरात ॲडमिशन घेतो. तुझं लक्ष राहील आणि अभ्यासही बरा होईल.'' ते बायकोला ऐकू जाईल असे सहज म्हणाले. निर्णय घेतल्याचा, चांगली जबाबदारी अंगावर घेतल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. इतक्यात मध्येच आठवण झाल्यासारखे ते म्हणाले, ''अग, तू उद्या, परवापासून वेळ मिळेल तशी तिला शिकवशील का?'' अभ्यासाबरोबर तिच्या सवयीसुद्धा आपणाला बदलाव्या लागणार आहेत.''

''कसं जमणार! तिची सकाळची शाळा, माझी दुपारची. संध्याकाळी सगळीच गडबड

## इको फ्रेंडली वटपौर्णिमा

**- सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८), अंधेरी, मुंबई

***५ जून हा दिवस आपण जागतिक पर्यावरण दिन म्हणून पाळतो. पण यावर्षी १४ जूनला येत असलेली वटपौर्णिमाच खरं म्हणजे पर्यावरण दिन म्हणून पाळायला हवी.***

वडाच्या फांद्या तोडून पतिसाठी प्रार्थना करताना पर्यावरणाला किती मोठी हानी पोचते हे आपल्या लक्षातच येत नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असं तुकोबा का लिहून गेले ते आपण जाणतच नाही. रुग्णाईत आणि निष्कांचन पतिला साथ देणारी सावित्री ही आदर्श पत्नी होती. सर्व बऱ्या-वाईट प्रसंगात पतिच्या पाठीशी उभी राहणारी प्रत्येक पत्नी ही सावित्रीच असते. त्यासाठी वनसंपत्तीचा नाश करायची काय गरज?

प्रदूषणापासून बचाव करायचा तर वने, जंगले यांचा बचाव केला पाहिजे. झाडे जमिनीची धूप थांबवतात, जलधारण शक्ति वाढवतात आणि हवा शुद्ध करतात. दारात साधी तुळस लावली तरी पिसवा व हिवतापाचे जंतू आपल्या घराकडे फिरकायची हिंमत करणार नाहीत.

या वटपौर्णिमेला सावित्रीचं स्मरण करून पतिसाठी आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य आणि समाजासाठी प्रदूषणमुक्त पर्यावरण मागू या.

Marathe Pratishthan

असते. एकंदरीत कठीणच वाटतं. पण बघू!'' रेगेमॅडमनी उत्तर दिले. तरीही त्यांनी मीराला संध्याकाळी ७ वाजता अभ्यासासाठी बोलाविले. तिचा अभ्यास चांगला होता. पण नीटनेटकेपणा, अक्षर यात सुधारणा होणे गरजेचे होते. काही सवयीसुद्धा बदलाव्या लागणार होत्या. पण सुधारणेची खात्री त्यांना वाटत होती. तिच्यात बदल घडून येत होते. रेगेंनी, माळ्याची मुलगी दत्तक घेतली. रेगेबाईंची मुलीची हौस भागली. येथपर्यंत बोलणी गेली. रेगेबाई शांतपणे सारं ऐकत होत्या. मीराची आईसुद्धा मीराला त्रास देत होती.

सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेतही मीराने उत्कृष्ट यश मिळविले. आता ती बरीच बदलली होती. एकदा आईबरोबर भांडी घासण्यासाठी गेली असता, एका बाईनी कुत्सितपणे टोमणा मारला, 'स्कॉलर विद्यार्थिनी भांडी कशी घासते आणि रेगे साहेबांना काय वाटेल?' मीराने उत्तर दिले नाही. कुत्सित बोलणाऱ्या व्यक्तीकडे काणाडोळा करण्याची शिकवण रेगेबाईंनी आपल्या वागण्यातून तिला दिली होती.

रेगे पती-पत्नी तिच्या प्रगतीवर नजर ठेवून होते. आठवी, नववी, दहावी सर्वच परीक्षांत मीरा ९२% ते ९४% मार्कस् मिळवत होती. वार्षिक परीक्षा जवळ आली. मीराकडून रेगेबाईनी अनेक प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या होत्या. परीक्षा सुरू झाली. एक एक करत पेपर्स संपले. रेगेबाईंनी परीक्षेनंतर मीराकडून सर्व पेपर्स परत सोडवून घेतले. त्यांची खात्री झाली. मीरा ९०% गुण मिळवून पास होणार.

चार पाच दिवसांनी मीरा घाईघाईने रेगेसरांकडे आली. ते चार दिवसाकरिता बाहेरगावी गेले होते. बाई घरात होत्या. मीरा त्यांना म्हणाली, ''बाई, आई-मामा माझ्या लग्नाचे निश्चित करत आहेत. मी काय करू? मला एवढ्यात लग्न करायचं नाही. तुम्ही दिलंत तर पुढे शिक्षण घ्यायचं आहे.'' एवढं बोलून ती, स्विच ऑफ करताच दिवा बंद होतो तशी बोलायची थांबली. रेगेबाई विचारात पडल्या. मीराला पुढचं शिक्षण द्यायचे बेत सर्वांनीच केले होते. तिच्या लग्नामुळे सर्वच बेत उधळणार होते. थोड्या वेळानं विचारलं, ''विचार करायला चार-आठ दिवस मिळतीलच ना, तोपर्यंत रेगेसाहेब सुद्धा येतील.''

''नाही बाई, उद्या किंवा परवाच तो मुलगा मामाबरोबर येईल. पाहून होकार दिला तर पुढील पंधरा दिवसात लग्न करून मोकळेसुद्धा होतील. माझ्या होकार-नकाराचा प्रश्नच नसतो. आई-बाबांना पसंत पडला की झालं.''

बाई विचारात पडल्या. हे थांबलच पाहिजे. रेगे येण्याची वाट त्या पहाणार नव्हत्या. त्या मीराला म्हणाल्या, ''आई-बाबांना ठामपणे नकार देऊन तू आमच्याबरोबर रहाण्यास तयार आहेस ना?'' मीराने ''हो'' म्हणताच, त्यांनी पायात चपला सरकविल्या. त्यांचा निर्णय ठाम झाला. मीरा आता माझी मुलगी झाली. ह्या दुष्ट चक्रातून तिची सोडवणूक झालीच पाहिजे. तरच ज्योतिराव-सावित्रीबाई फुले यांच्या आत्म्याला शांती मिळेल. ***

---

# आम्ही पाहिलेले न्यूयॉर्क : वर्ल्ड ट्रेड सेंटरसह

**- सौ. माधवी श्रीकृष्ण** (पृ.२८८), गोरेगांव, मुंबई

***ज्या वास्तूवर आपण मजा म्हणून फेरफटका मारला, ज्या वास्तूची अद्‌भुतता अनुभवली ती अशी क्षणांत उध्वस्त व्हावी! डोळ्यातून पाझरणाऱ्या पाण्याने वर्ल्ड ट्रेड सेंटरला लागलेला वणवा कधीतरी विझेल का? अशी दुसरी वास्तू उभी राहू शकेल; पण ती पहिली असणार नाही हे नक्कीच!!***

अखेर गुरुवार दि. १३ मे १९९९ चा दिवस उजाडला! अनेकांच्या मदतीने सगळ्या गोष्टींची पूर्तता करून आम्ही दोघांनी रात्री ९.३० वाजता आमच्या पहिल्या वहिल्या परदेश प्रवासासाठी - अमेरिकेला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. विमानाने आकाशात उंच भरारी घेतली जणू आम्हालाच पंख फुटले होते. हा अनुभवाचा आणि आनंदाचा क्षण आम्हाला अर्थातच आमच्या मुलामुळे - शेखरमुळे मिळाला होता. त्याची स्वत:ची भरारी होती म्हणूनच त्याच्यापाठोपाठ आम्हाला पण पंख फुटले!!

ह्या अमेरिकेच्या वास्तव्यात खूप काही अनुभवले. अनेक गोष्टी बघितल्या. मनुष्य स्वभावाचे वेगवेगळे नमुने प्रत्ययास आले. तसा हा अविस्मरणीय अनुभव.

अचानक एक दिवस शेखरला स्फूर्ती झाली - ह्या विकएंडला न्यूयॉर्कला जायचे. आम्ही २९.७.९९ ला शुक्रवारी संध्याकाळी शेखर ऑफिसमधून आला की रात्री ७.३० ला प्रवासास सुरवात करण्याचा निर्णय घेतला. आमच्या बरोबर यायला आणखी एक चांगली कंपनी मिळाली. शेखरचा एक मित्र राजेश कर्णेकर आणि त्याची नवविवाहित पत्नी रिमा! सहा माणसांना म्हणून शेखरने एक व्हॅन बुक केली.

नवीन प्रदेश बघण्याची अनावर उत्सुकता होती. रस्त्यांवर भरपूर लाईट्स होते. एकादे शहर जवळ आले तर दिवाळीतील दिव्यांची रोषणाई केली आहे काय असे वाटत होते. रस्त्यांवरचे साईन बोर्डस्, मागून पुढून धावणाऱ्या निरनिराळ्या कंपन्यांच्या वेगवेगळ्या आकाराच्या, वेगवेगळ्या डिझाईन्सच्या, वेगवेगळ्या रंगांच्या गाड्या पहातांना खरोखरच लहान मुलांसारखी गंमत वाटत होती. एखादा महाभाग वाहतुकीचे सगळे नियम धाब्यावर बसवून शर्यतीतील घोड्यासारखा पुढे जायचा प्रयत्न करीत होता. मुंबईहून आला आहे की काय असे वाटण्याइतपत आपल्याच मस्तीत ड्रायव्हींग करीत होता. पण असा एखादा दुर्मिळच. कारण इथे स्पीड लिमीट फारच कसोशीने पाळले जाते. काही काही ठिकाणी रडार चेकींग असते!

दुसऱ्या दिवशी न्यूयॉर्क शहर बघण्यासाठी आमची ताकद कायम रहावी म्हणून शेखर आम्हाला सतत झोपण्याचा आग्रह करीत होता पण आम्ही सुद्धा तरुणांच्या तरुणाईत रंगून गेलो होतो. त्यांच्या कॉलेज जीवनातल्या



Marathe Pratishthan

आठवणी, पार्ला-डहाणू कॉलेज, तेथील वडापाववाले, नवे जुने मित्र मैत्रिणी ह्या त्यांच्या गप्पात आम्हाला पण रस वाटत होता. आपले वय थोडे कमी झाले आहे असे वाटले!! मध्ये दोन तीन ठिकाणी थांबलो चहा पाणी घेतले. तेवढेच आमच्या ड्रायव्हरला - शेखरला ताजेतवाने वाटले.

आतापर्यंत फक्त ह्या शहराबाबत खूप काही ऐकलेले होते. पण आज ते प्रत्यक्ष पहायला मिळाले. सगळ्यात प्रथम आम्ही स्टॅच्यू ऑफ लिबर्टी म्हणजे स्वातंत्र्य देवतेचा पुतळा इथे जाऊन पोचलो. सकाळचे ६।। ते ७ वाजले होते. तिथे जवळच एका सौंदर्य प्रसाधनेच्या जागेचा शोध घेतला. संध्याकाळपासूनचा प्रवास होत होता. प्रत्येकजण दमला होता. नुसते गाडीत बसूनच बर! गाडी चालविणारा आमच्या सर्वांपेक्षा ताजातवाना आणि फ्रेश होता. आम्ही सर्वांनी तोंड धुण्यापासून आमचे सगळे कार्यक्रम उरकून घेतले. कपडे बदलले. कै. व. पु. काळ्यांच्या ''गर्भ श्रीमंतीचा क्षण'' ह्या कथेची आठवण झाली. बरोबर आणलेल्या खाद्य पदार्थांचा स्वाद घेतला आणि पुढील मार्गक्रमणेला सुरवात केली.

आम्हाला वाटले होते आपण खूपच लवकर आलो आहोत. बहुतेक आपलाच पहिला नंबर लागेल. पण फेरीसाठी जाऊन बघतो तर काय आमच्यापुढे सुमारे १०० माणसे उभी होती. ३ महिन्याच्या तान्हुल्यापासून पाऊणशे ऐंशी वर्षांच्या वृद्धापर्यंत. त्यादिवशी हवामान एकदम कुंद झाले होते. धुके पडत होते. पावसाची शक्यता जाणवत होती. फोटो चांगले येणार नाहीत म्हणून काहीशी खंत वाटत होती. पण त्याला इलाज नव्हता.

८.३० वाजता फेरीची बोट धक्क्याला लागली. आणि आम्ही डेकवर जाऊन बसण्यासाठी जागा पकडली. पण एकदा बोट सुरू झाल्यावर मोठ्या शिताफीने पकडलेली जागा जवळ जवळ प्रत्येकानेच सोडून दिली. संपूर्ण डेक माणसांनी फुलून गेला. अवर्णनीय सौंदर्य! प्रचंड जलाशयाच्या मध्यभागी उभी असलेली भव्य वास्तू!! लिबर्टीचे फोटो प्रत्येक दिशेने घेतले जात होते. एकहि कोन कॅमेरातून निसटू नये म्हणून प्रत्येकाची धडपड चालली होती. सगळेच सहप्रवासी एक झाले होते. आपापसांत चर्चा - विचार विनिमय - लिबर्टीबद्दल असलेली माहिती एकमेकाला सांगण्यात लिबर्टीच्या प्रांगणात कधी उतरलो ते कळलेच नाही.

पुतळ्याच्या आतून वर मुगुटाच्या खिडक्यांपर्यंत पोचायला ३५५ पायऱ्या आहेत. महाराष्ट्रांतील किल्ले रोप-वे ने चढणाऱ्या आमच्या मराठमोळ्या पायांत ताकदहि नव्हती आणि वेळहि नव्हता. खालूनच सगळा पुतळा आणि परिसर हिंडून पाहिला. किती आणि काय पाहू आणि काय नको असे झाले होते!

इतक्या लांबच्या प्रदेशात आम्हाला एक टिपिकल पुणेरी ब्राह्मण कुटुंब भेटले, ओळखीचे नव्हते पण आधी भारतीय आणि त्यात मराठी ब्राह्मण एव्हढे कारण ओळख होण्यास पुरेसे होते. बघितल्याबरोबर वर्षानुवर्षांची जुनी ओळख असल्यासारख्या आम्ही गप्पा मारीत होतो. कदाचित पुन: ठरवून सुद्धा मुंबई पुण्यात आमची भेट होणार नाही पण परदेशांत असताना जाणवणारी आपुलकी काही वेगळीच!

आम्ही आता अमेरिकेतील सर्वात प्रसिद्ध ठिकाण World Trade Centre (वर्ल्ड ट्रेड सेंटर) बघण्यासाठी पुढे निघालो. जगातील सर्वात उंच इमारत! ह्या दोन्ही इमारतींना ११० मजले आहेत. १०७ मजल्यापर्यंत एलिव्हेटर म्हणजे लिफ्ट जाते. ह्या इमारतीत आत शिरुन पहायला जाण्यासाठी $१२ इतके तिकीट आहे. तिथेपण लाईन! तिकिटे काढून झाल्यावर आमचा प्रत्येकाचा एक फोटो काढला. आमची कसून तपासणी झाली. त्यानंतर आमच्या संपूर्ण ग्रूपचा एक फोटो काढला. ही सावधगिरीची उपाययोजना.

१९९४ साली ह्या इमारतीमध्ये बॉम्ब स्फोट घडवून आणण्याचा प्रयत्न झाला होता. त्या कटामधील एका आरोपीला फाशीची शिक्षा झाली, आणि दोघांना जन्मठेपेची. मुंबईमध्ये १९९२-९३ साली बॉम्ब स्फोटाने हाहा:कार उडविला होता. स्टॉक एक्स्चेंजची इमारत उडविण्याचा प्रयत्न झाला. आज इतकी वर्षे झाली तरी आमच्या सरकारला आरोपी सापडत नाहीत आणि सापडले तरी निकाल लावता येत नाही. असो!

आम्ही १०७व्या मजल्यावर जाण्यासाठी एलिव्हेटर मध्ये गेलो. ही एक प्रचंड मोठी खोली होती. सुमारे ५० ते ६० माणसे एका वेळेला जाऊ शकतात. तळमजल्यावरून १०७व्या मजल्यावर जायला ५९ सेकंद लागले. पूर्ण एक मिनीटपण नाही! कुठे आहोत हे समजण्यापूर्वीच १०७ व्या मजल्यावर येऊन पोहचलो. ताशी २५ मैल वेगाने!! काहीसे आश्चर्य आणि खूपशी गंमत वाटली. इतक्या उंचावरून सुद्धा अनेक गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. प्रत्येक दिशेने शेखर वेगवेगळी माहिती सांगत होता. रस्त्यांची, इमारतींची, टनेल्सची! त्यानंतर आम्ही सरकत्या जिन्याने ११०व्या मजल्यावर पोचलो. आधी पिझ्झा खाऊन घेतला. प्रत्येकालाच भूक लागली होती. वरून दिसणारे सृष्टिसौंदर्य बघायला ताकद हवी होती!

सगळ्यात शेवटच्या मजल्यावर ओपन टेरेस होती. प्रचंड ऊन लागत होते. इथे पुन्हा हवामानात अकस्मात होणाऱ्या बदलाचा अनुभव आला! सकाळी कुंद होते, आता कडक ऊन पडले होते. पण बघण्याची हौस दांडगी. आम्ही एक तास त्या रणरणत्या उन्हात उभे होतो. खूप मजा आली. खूप फोटो घेतले. एका मस्त धुंदीतच परतीचा प्रवास सुरू केला! इथून परततांना कुठेतरी पाल चुकचुकली होती का?

ह्या दोन प्रचंड मोठ्या इमारती म्हणजे अमेरिकेचा मानबिंदू! आपल्या ताजमहालाचे सौंदर्य या इमारतींना लाभले नाही. मुसलमानी शिल्पकला कृतींचा स्पर्शहि त्यांना झालेला नाही तरी सुद्धा साधे सुधे सौंदर्य - प्रचंड स्वच्छता - अत्याधुनिक यंत्रणा यामुळे साऱ्या जगाचे ते एक आकर्षण! या इमारतींमध्ये अमेरिकेची औद्योगिक वसाहतच आहे. इथूनच अमेरिकेच्या आर्थिक विकासाची सुरवात आहे! त्यामुळे सुद्धा ह्या इमारतींचे महत्त्व! आजहि तेथील टापटीप आणि स्वच्छता नजरेसमोरून हलत नाही!

आज ११ सप्टेंबर! अमेरिकेच्या इतिहासातील, वर्तमानांतील आणि

Marathe Pratishthan

# वार्धक्याविरुद्ध लढा

- डॉ. सौ. सीमा श्याम (पृ.४११), पुणे

*खरं तर सृष्टिनियमानुसार प्रत्येक व्यक्तीच्या शरीराची रचना व क्षमता १२० वर्षे जगण्याची असते. परंतु बऱ्याच व्यक्ती ७० ते ८० वयाच्या दरम्यान अनेक गंभीर दुखण्याने आजारी असतात.*

बऱ्याच वेळा आपण पहातो की पस्तिशीत असतानाच काही व्यक्ती साठीच्या दिसतात. या व्यक्तींमध्ये धातूक्षीणता लवकर येते. यालाच Early Ageing असे म्हणतात.

याउलट काही व्यक्ती ६५ वर्षाच्या असूनसुद्धा पन्नाशीच्या वाटतात. उत्साहाने कामे करतात. उठणे, बसणे, वागणे यांत शिस्त असते. जेवण, झोप, काम यात नियमबद्धता असते. आणि इतर व्यक्तींशी संपर्क साधायची आवड व इच्छा असते. जगण्याची उमेद असते. कला, साहित्य, चिंतन, मनन याकरिताही काही वेळ ठेवलेला असतो.

**अकाली वार्धक्य येण्याची कारणे -**

अकाली वार्धक्य येण्याची काही महत्त्वाची कारणे अशी आहेत.

**१) व्यसने** -सर्वसाधारणपणे वाईट संगत व मानसिक कमकुवतपणा, योग्य अयोग्य यामधील जाणीव नसणे यामुळे मद्यपानाचे व्यसन लागते. हल्ली तर मद्यपान करणे हे प्रतिष्ठितपणाचे लक्षण समजले जाते. अतिमद्यपानाने जठरातील पित्ताचे प्रमाण वाढते व जठर आतून लाल होऊन सूज येते. पुढे अल्सर्स (जखमा) होतात. जखमा फार खोल झाल्यास त्या फुटतात व ताबडतोब ऑपरेशन करून जठर ज्या ठिकाणी फुटलेले आहे किंवा भोक पडलेले आहे तेथे शिवून पूर्ववत करावे लागते. त्याचप्रमाणे यकृत (लिव्हर), प्लीहा, आतडे यावरही परिणाम होतो. यकृतात बिघाड झाल्यास काविळीसारखे रोग होतात. त्वचेखालील बारीक रक्तवाहिन्या तुटून तेथूनही रक्तस्राव होतो. शरीराचा तोल जाऊन पडण्याची शक्यता असते.

वरील शारीरिक पीडा तर होतेच परंतु याशिवाय कुटुंबकलह, आर्थिक स्थिती ढासळणे, नैराश्य येणे यासारख्या गोष्टी होतात. परिणामी सामाजिक प्रतिष्ठा कमी होते.

**सिगारेट ओढणे, तंबाखू खाणे, झोप येण्याकरिता गोळ्या जास्त प्रमाणात घेणे किंवा इतर ड्रग्सची सवय लागणे ही व्यसनेही फार वाईट आहेत.** यामुळेही शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक बाजूंनी व्यक्तीची कोंडी होते. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य ढासळते आणि वार्धक्याच्या दिशेने व्यक्ती पावले टाकू लागते.

**२) अतिश्रम करणे किंवा अतिशय कमी हालचाल करणे**

**अतिश्रम** सातत्याने केल्यामुळे शरीराची झीज फार प्रमाणात होते. विश्रांती कमी मिळाल्यामुळे झीज परत भरून काढायला वेळच उरत नाही. परिणामी शक्ती क्षीण होत जाते. अशक्तपणामुळे मानसिक दौर्बल्य येते. अशा व्यक्ती लवकरच म्हाताऱ्या दिसू लागतात.

**अतिकमी हालचाल केल्यामुळे रक्ताभिसरण कमी होते.** शरीरात मेद (चरबी) साचून राहातो. वजन वाढते. शरीर बेडौल होते. चपळता कमी होते. प्रमाणाबाहेर वाढलेल्या वजनामुळे सांधेदुखी, डायबेटिस, हृदरोग, पाठीच्या कण्याची दुखणी, अन्नपचनाचे विकार होतात. या सर्व विकारांचा परिणाम थोड्याच वर्षात दिसू लागतो. वार्धक्य येऊ लागते.

**३) फार वेळ कडक उन्हात** काम केल्यामुळे शरीराचे तापमान वाढते. फार घाम आल्यामुळे शरीरातील द्रव कमी होऊन कृशता येते. अतिप्रखर उन्हाचा त्वचेवरहि परिणाम होतो. त्वचा काळी व रुक्ष होते. त्यावर सुरकुत्या लवकर पडतात व व्यक्ती वयस्क दिसू लागते.

**४) अयोग्य आहार** - वेळी अवेळी, निषिद्ध अन्न, शिळे अन्न जास्त प्रमाणात खाल्ल्याने पचनाचे विकार होतात. शरीराचे पोषण योग्य प्रमाणात होत नाही. परिणामी वेगवेगळ्या तऱ्हेच्या व्याधी ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांना होतात. त्वचा जाडसर, सुरकुतलेली व निस्तेज होते. उत्साह कमी होतो. काम करण्याची क्षमता कमी होते. आणि त्यामुळे लवकर वार्धक्याकडे व्यक्ती झुकू लागते.

**५) मानसिक ताण** - शरीरांतर्गत रोग व बाहेरील अयोग्य वातावरण, कौटुंबिक कलह, व्यवसायाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्या, सामाजिक राजकीय परिस्थिती वगैरेंमुळे मनावर प्रचंड ताण येतो. मनस्वास्थ्य बिघडते व त्याचा साहजिकच शरीरावर परिणाम होतो व आयुर्मान कमी होते.

वर दिलेल्या सर्व कारणांमुळे शरीरात प्रचंड प्रमाणात अनैसर्गिक व हानिकारक अशा घडामोडी होऊ लागतात व शेवटी अस्थिर स्वरूपाचे विषवत् असे घटक तयार होतात. यांना 'फ्री रॅडिकल्स' असे म्हणतात. या घटकांचे अणू शरीरातील पेशी, धातू, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये इ. वर हल्ला करतात व वार्धक्याकडे नेऊ लागतात.

*(उर्वरित भाग पुढील अंकात)*

---

(*आम्ही पाहिलेले न्यूयॉर्क... मागील पानावरून*)

भविष्यकाळातीलसुद्धा एक भयानक आणि अंध:कारमय असा दिवस! संध्याकाळी सुनेचा - सोनियाचा फोन आला. ''आई, वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला आहे!'' माझा माझ्या कानांवर विश्वासच बसला नाही. तिला म्हटले ''आज काय आईची थट्टा करायचा मूड आहे का?'' ''नाही आई, टि.व्ही. लावा.'' तिला पुढे बोलताच येईना. ती रडत होती!

खरोखरच दूरदर्शनवर सतत बातमीच येत होती. तिथे घडणाऱ्या घटना इकडे लाईव्ह दाखवीत होते. ह्या इमारती डोळ्यांसमोर कोसळताना दिसत होत्या. धुराचे लोटच्या लोट डोळ्यासमोर आले! धुळीच्या आणि डोळ्यांतील अश्रूंच्या धारेत पुढचे दृश्य धूसरच होत राहिले. ज्या वास्तूवर आपण मजा म्हणून फेरफटका मारला, ज्या वास्तूची अद्भुतता अनुभवली ती अशी क्षणांत उध्वस्त व्हावी! डोळ्यातून पाझरणाऱ्या पाण्याने वर्ल्ड ट्रेड सेंटरला लागलेला वणवा कधीतरी विझेल का? अशी दुसरी वास्तू उभी राहू शकेल; पण ती पहिली असणार नाही हे नक्कीच!! ***



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**विठ्ठल महादेव (पृ.२३५), म. प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेमार्फत आलेली स्थळे ४०/२००३ ते ५३/२००३**

**क्र. ४०/२००३ वर** - सचिन श्रीकृष्ण दिवेकर, को.ब्रा., गोत्र-वाशिष्ठ, जन्म - २५.९.१९७५, BSC, MCM, बिल्डींग मटेरीअल सिंटेक्स टँक वितरण, मा. प्रा. रु. ८ ते १० हजार, स्वत:चे घर व व्यवसायाची जागा. **अपेक्षा** - गृहकृत्यदक्ष, सडपातळ, अनुरूप. **संपर्क** - श्रीकृष्ण हरीभाऊ दिवेकर, प्लॉट नं. ५, कल्पतरु कॉलनी, तासगांव वेस, मिरज ४१६४१०, फोन : ०२३३-२२२२४७९

**क्र. ४१/२००३ वर** - समीर सुहास आपटे, कोब्रा., गोत्र-कौशीक, जन्म - १६.६.१९७४, उंची - ५'-११'', D.E.E., कॉम्प्युटर सेंटर व मेडीकल इन्स्ट्रमेंट रिपेअरी, सप्लाय रु. ५००० चे वर स्वत:चे घर १००० चौ.फूट. **अपेक्षा** - ग्रॅज्युएट, एकत्र राहण्यास तयार **संपर्क** - सुहास आपटे, कृष्णाली वसाहत, कॉमर्स कॉलेजच्या मागे, विश्रामबाग, सांगली ४१६४१५ फोन : २६०१३४१.

**क्र. ४२/२००३ वर** - समीर दीपक बर्वे गोत्र-कौशीक, जन्म - ४.९.१९७४, उंची - ५'-१०'', B.SC. Micro. १९९५ पासून L.I.C. मधे Assistant, मा. प्रा. रु. ११०००, स्वत:चा वाडा. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - दीपक रामचंद्र बर्वे, श्रीरामनिवास, गणपती मंदिराजवळ, तासगांव, जि. सांगली ४१६३१२. फोन : ०२३४६-२४०२११.

**क्र. ४३/२००३ वर** - उल्हास वसंत मराठे, कोब्रा.,गोत्र-कपि, जन्म - २०.११.१९७२, उंची - ५'-४'', Mech. Draftsman, प्रायव्हेट कन्सल्टन्सीत नोकरी Dip. in Mech. Engineer. मा. प्रा. रु. ६०००, स्वत:ची जागा. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - श्री. वसंतराव मराठे, ऋतुराज अपार्टमेंट, MIDC रोड, कातदरे मंगल कार्यालयाजवळ, बदलापूर (पूर्व) ४२१५०३. फोन : २६९७९९८.

**क्र.४४/२००३ वर** - योगेश गोविंद जोशी, कोब्रा, गोत्र-वत्स, जन्म - ४.११.१९७८, उंची - ५'-७'', B.Com., आंबा, नारळ इ. च्या बागा, किटक नाशक दुकान, मा. प्रा. रु. १५००० ते २००००. **अपेक्षा** - किमान १२वी, ५ फूटाचे वर उंची. **संपर्क** - श्री. गोविंद नारायण जोशी, मु. पो. जामसांडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, फोन : ९५२३६४-२४२३४८.

**क्र. ४५/२००३ वर** - चंद्रशेखर वामन खाडीलकर, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ३.७.१९७५, उंची - ५'-८'', १०वी पास, मोटार मेकॅनीकचा कोर्स, ५ एकर बागायती, १ एकर द्राक्ष बाग, मा. प्रा. रु. ५००० चे वर, **अपेक्षा** - शेती विषयी आवड असणारी, जायगव्हाण, ता. कवठेमहांकाळ येथे राहण्याची तयारी असणारी. **संपर्क** - अपर्णा कोल्हटकर, किल्ला भाग, मु. पो. मिरज, जि. सांगली, जायगव्हाण, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.

**क्र. ४६/२००३ वर** - राहुल मधुकर कुलकर्णी, देब्रा, गोत्र-भारद्वाज, जन्म - २७.११.१९७७, उंची - ५'-६'', B.Text, CDAC, पुणे येथे सॉफ्टवेअर, इंजिनियर म्हणून नोकरी, मा. प्रा. रु. ७०००, सांगली येथे बंगला, पुणे येथे फ्लॅट व प्लॉट. **अपेक्षा** - नोकरी करणारी, शक्यतो इंजिनियर उंची ५'-३'' चे पुढे. **संपर्क** - मधुकर विठ्ठल कुलकर्णी, मधुबन, गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली ४१६४१५. फोन : ०२३३-२३०४५०४.

**क्र. ४७/२००३ वर** - अतुल चंद्रकांत कुलकर्णी, देब्रा, गोत्र-वाशिष्ठ, जन्म - २५.१२.१९७५, उंची - ५'-५१/२'', B.E. (Mech.), किर्लोस्कर कोपलॅंड कराड येथे नोकरी, मा. प्रा. रु. १२०००, स्वत:चे घर सांगली येथे. **अपेक्षा** - B.E. BAMS. BHMS. B.SC. **संपर्क** - विकास चंद्रकांत कुलकर्णी, सिद्धकृपा, त्रिमूर्ती हौ. सोसायटी, लक्ष्मीनारायण अपार्टमेंट शेजारी, द. शिवाजी नगर, सांगली, फोन : २३२०२७६.

**क्र. ४८/२००३ वधू** - सोनाली पाटणकर, कोब्रा, गोत्र-शांडील्य, जन्म - २४.४.१९८१, उंची - ५'-३'', M.Com., शेवटच्या वर्षाला, Tally कोर्स पूर्ण. **अपेक्षा** - नोकरी किंवा व्यवसाय, पुणे परिसरातील असावा. **संपर्क** - बंडोपंत विष्णू पाटणकर, विष्णू लक्ष्मी सहनिवास, अंबाबाई तालमीजवळ, मिरज ४१६४१०. फोन : २२२२१६२.

**क्र. ४९/२००३ वधू** - धनश्री पद्माकर पोंक्षे, कोब्रा, जन्म - २८.८.१९८१, उंची - ५'-२'', चष्मा नाही, B.Com. DIT. **अपेक्षा** - कोकणस्थ, ग्रॅज्युएट, नोकरी, व्यवसाय चालेल. **संपर्क** - पद्माकर रामचंद्र पोंक्षे, बी-८, महादेवनगर, राधानगरी रोड, कोल्हापूर ४१६०१२. फोन : २३२०५४६.

**क्र. ५०/२००३ वधू** - मधुरा नारायण बेडेकर, कोब्रा, गोत्र-गार्ग्य, जन्म - २८.४.१९८१, उंची - ५'-०'', गौर वर्ण, B.SC (Physics). **अपेक्षा** - उच्चशिक्षित, स्मार्ट, निर्व्यसनी. **संपर्क** - श्री. नारायण शंकर

Marathe Pratishthan

बेडेकर, ५५६/३ सुयोग, सिटी सर्व्हे ऑफिस जवळ, कोल्हापूर रोड, सांगली ४१६४१६ फोन : ०२३३-२३३१०६८.

**क्र. ५१/२००३ वधू** - मनीषा विनायक मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - २१.५.१९७६, उंची - ५'-२'', बी.ई. कॉम्प्युटर. **अपेक्षा** - १ ते ५ वर्षे अंतर, M.E. CA. B.E. M.Tech. इ. **संपर्क** - श्री. विनायक मराठे, सिव्हील हॉस्पीटल समोर, हरीप्रसाद हॉटेलच्या वर, सांगली ४१६४१६. फोन : २३२६५१७.

**क्र. ५२/२००३ वधू** - संपदा अरुण कुलकर्णी, देब्रा, गोत्र-वाशिष्ठ, जन्म - २६.८.१९८०, उंची - ५'-२'', गौरवर्ण, B.S.L. LLB. **अपेक्षा** - उच्चशिक्षित, चांगली नोकरी, व्यवसाय. **संपर्क** - अरुण कृष्णाजी कुलकर्णी, पद्मावती ३०४/१९, जुना कुपवाड रोड, सह्याद्री नगर, सांगली ४१६४१६. फोन : २३२०५३९.

**क्र. ५३/२००३ वधू** - अश्विनी गोविंद जोशी, देब्रा, गोत्र-पुतीभाष, जन्म - १३.५.१९८०, उंची - ५'-३'', गोरी, B.Com. DBM. **अपेक्षा** - अनुरूप, व्यवसाय. **संपर्क** - गोविंद बाळकृष्ण जोशी, 'कमळ', प्लॉट नं. २३, सांगली-मिरज रोड, विश्रामबाग, सांगली ४१६४१५. फोन : २३०५४४४.

## सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), म. प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत आलेली स्थळे ५४/२००३ ते ७०/२००३.

**क्र. ५४/२००३ वधू** - योगिनी प्रभाकर देशमुख, देब्रा, गोत्र-काश्यप, वय - ३२ पूर्ण, उंची - ५'-२'', गहूवर्ण, मध्यम बांधा, B.Sc. Computer Course. कॉसमॉस बँकेत कायम नोकरी, मा. प्रा. रु. ७०००, आई-वडील व विवाहित बहीण, गृहकृत्यदक्ष, साहित्य, संगीत, बागकामाची आवड. **अपेक्षा** - फक्त पुण्यातच वास्तव्य करणारा, कोणत्याही शाखेचा पदवीधर अथवा डिप्लोमा होल्डर, नोकरी सरकारी, खाजगी किंवा निमसरकारी, वय ३३ ते ३८ पर्यंत, ब्राह्मण कोणत्याही पोटशाखेचा चालेल, मुलीला अनुरूप असावा, उंची ५'-४'' च्या पुढे. **संपर्क** - प्रभाकर दिगंबर देशमुख, २६७ बुधवार पेठ, ढमढरे वाडा, श्रीकृष्ण टॉकीजजवळ, पुणे ४११००२.

**क्र. ५५/२००३ वधू** - वैशाली शशिकांत मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - १०.९.१९६८, उंची -५'-३ १/२'', गोरी, मध्यम बांधा, वडील व १ विवाहित भाऊ, B.Com. Interior Decoration. Internet & Computer Course, स्वत:चे दुकान. **अपेक्षा** - शक्यतो पुण्यातला, कोणत्याही ब्राह्मण शाखेचा, नोकरी वा धंदा काहीही चालेल. मा. प्रा. रु. १००००. **संपर्क** - शशिकांत भास्कर मराठे, ११७८/२०, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००५. फोन : घर ५५३५९८५, ज्ञानेश मंगल कार्यालय, फोन : ५५३४६१७

**क्र. ५६/२००३ वधू** - अर्चना पद्माकर वडनेरकर, अहिर सोनार, गोत्र-गोवत्स, जन्म - २३.११.१९७०, उंची - ४'-४'', गव्हाळ वर्ण, सडपातळ, M.Com., ग्राहकपेठ डिपार्ट. स्टोअर्समध्ये सीनिअर ऑफिसर, मा. प्रा. रु. ३५००, आई, दोन भाऊ, दोन बहिणी विवाहित, वडील नाहीत. **अपेक्षा** - नोकरी वा व्यवसाय चालेल, अनुरूप हवा, कोणत्याही जातीचा मराठा ब्राह्मण, सोनार चालेल. **संपर्क** - प्रवीण पद्माकर वडनेरकर (भाऊ), ६४२, नारायण पेठ, पुणे ३०.

**क्र. ५७/२००३ वधू** - रेश्मा विश्वनाथ डोळे, देब्रा, गोत्र-मुनिभार्गव, जन्म - १३.७.१९७९, उंची - ५'', वर्ण सावळा, सडपातळ, रक्तगट AB+ve. चष्मा आहे, M.A.. पॅथॅलॉजिकल लॅबमध्ये अर्धवेळ नोकरी - रिसेप्शनिस्ट, मा. प्रा. रु. ५००, घरकाम, सुगम संगीत, ट्रेकिंगची आवड, घरची परिस्थिती मध्यम, दोन थोरले भाऊ - १ विवाहित, १ अविवाहित, आई वडील हयात नाहीत. **अपेक्षा** - ५'-४'', वय २८ पर्यंत, किमान ग्रॅज्युएट, नोकरी कायमस्वरुपी, परगावी बदलीची नसावी, ब्राह्मणच असावा. **संपर्क** - राजीव विश्वनाथ डोळे (भाऊ), ४७८/अ, शनिवार पेठ, ओम अपार्टमेंटस्, हरिहरेश्वर मंदिराजवळ, पुणे ३०, फोन : ४४८२६६७.

**क्र. ५८/२००३ वधू** - आरती विश्वास पुरोहित, कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र-कौशिक, जन्म - ११.५.१९७७, उंची - ५'-७'', गोरी, मध्यम बांधा, रक्तगट B+ve, M.Com. DBM, MMS. नोकरी नाही, आई-वडील, आईला कोड, भाऊ सॉफ्टवेअर इंजिनियरिंग करतोय, वाचन, संगीत, प्रवासाची आवड. **अपेक्षा** - उंची ५'-९'', वय २६-२८, शिक्षण Post Graduate, नोकरी कायमस्वरूपी, मासिक उत्पन्न ३००००/५००००. **संपर्क** - विश्वास नरहर पुरोहित, फ्लॅट नं. २, प्रज्ञेश अपार्टमेंट, स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या समोर, कोथरुड, पुणे ४११०३८.

**क्र. ५९/२००३ वधू** - निवेदिता सुहास गोखले, कोब्रा, गोत्र-काश्यप, जन्म - २०.११.१९७९, उंची - ५'', वर्ण गोरा, सडपातळ, रक्तगट A+ve. B.A. संगीत विशारद, जपानी भाषेच्या दोन परीक्षा. मंगळ आहे, नोकरी प्रभुकृपा शाळेत क्लार्क, अर्धवेळ, मा. प्रा. रु. ३००, आई, वडील आहेत, १ भाऊ. **अपेक्षा** - कोकणस्थ नोकरी वा व्यवसायही चालेल, २५-२७ उच्चशिक्षित व पुण्यातला हवा. **संपर्क** - सुहास गोविंद गोखले, २०२ शुक्रवार पेठ, काळ्या हौदाजवळ, लक्ष्मी अपार्टमेंट, पुणे २, फोन : ४४८७६१०.

**क्र. ६०/२००३ वधू** - रश्मी सुहास जोशी, कोब्रा, गोत्र-शांडिल्य, जन्म - १०.१०.१९८०, उंची - ५'-४'', गहूवर्ण, मध्यम बांधा, सौम्य मंगळ, रक्तगट A+ve. B.A. (Psychology). डिप्लोमा इन चाइल्ड अँड फॅमिली कौन्सेलिंग, नोकरी - जीवन मार्गदर्शन केन्द्र गरवारे कॉलेज, मा. प्रा. रु. २०००, नृत्य व सामाजिक कार्याची आवड, आई-वडील, १ लहान बहीण, **अपेक्षा** - वय २४ ते २८,



Marathe Pratishthan

कोणतेही क्षेत्र चालेल पण सुस्थिती असावी, स्वभाव मनमोकळा, समंजस, कलेची आवड, मध्यमवर्गीय. **संपर्क** - सुहास जनार्दन जोशी, १८ मुरलीधर निवास, १३५९, सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन : ४४८२७६८.

**क्र. ६१/२००३ वधू** - शीतल विनोद कुळकर्णी, दे. यजुर्वेदी ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - २.२.१९७९, उंची - ५'-४'', मध्यम बांधा, B.Com., बडोदा येथे खाजगी नोकरी, आई-वडील, धाकटा भाऊ, स्वत:चा फ्लॅट. **अपेक्षा** - सुशिक्षित (पदवीधर) ब्राह्मण. **संपर्क** - विनोद विष्णु कुळकर्णी, T११, शिवम फ्लॅटस्, राजेश टॉवर जवळ, गोत्री रोड, वडोदरा ३९००२१, फोन : २३९८६००.

**क्र. ६२/२००३ वधू** - स्मिता गजानन जोशी, कोब्रा, गोत्र-गार्ग्य, जन्म - १२.१.१९७८, उंची - ५'-७'', सडपातळ, गोरी, M.Com. MCM. खाजगी संस्थेत कॉम्प्युटरचे काम रु. ३०००, आई-वडील, विवाहित बहीण, भाऊ (लग्न ठरले आहे). **अपेक्षा** - नोकरी किंवा धंदा, स्थिर व चांगल्या स्वरूपाचा, शक्यतो पुण्यात, कोकणस्थ, उच्चशिक्षित. **संपर्क** - बी-९, शिवपुष्प पार्क, सिंहगड रोड, आनंदनगर, मधुकर हॉस्पिटलमागे, पुणे ४११०३०, फोन : ४३४५४३९.

**क्र. ६३/२००३ वधू** - सुमेधा हणमंतराव कुळकर्णी, दे.ऋ., जन्म - १८.११.१९७१, उंची - ५'-२'', गोरी, B.E. Civil सरकारी नोकरी (पुण्यातच; बदली नाही), मा. प्रा. रु. १५०००, १ विवाहित भाऊ, १ विवाहित बहीण. **अपेक्षा** - कोणत्याहि ब्राह्मण शाखेचा, उच्चशिक्षित, पुण्यातलाच. **संपर्क** - हणमंतराव रामराव कुळकर्णी, ब्लॉक नं. ६०, लक्ष्मी विष्णू सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर ३, फोन : (०२१७) २६०२४३०.

**क्र. ६४/२००३ वर** - निखिल आनंद पाटणकर, कोब्रा, जन्म - २५.१२.१९७७, उंची - ६'', बी.ई. कॉम्प्युटर, खाजगी कंपनीत इंजिनियर, गोरा, सडपातळ, आई-वडील व एक विवाहित बहीण, घरची आर्थिक स्थिती चांगली. **अपेक्षा** - उच्चशिक्षित, ५'-४'', पत्रिका पहायची आहे, कमीतकमी ३ वर्षाचे अंतर असावे, शक्यतो कोकणस्थ. **संपर्क** - आनंद गोपाळ पाटणकर, ७२२ अ ब नवी पेठ, लक्ष्मी पार्क कॉलनी, साधना बंगला, पुणे ४११०३०, फोन : ४३३७७६८.

**क्र. ६५/२००३ वर** - आमोद अनिल मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ९.९.१९७४, उंची - ५'-१'', मध्यम बांधा, रक्तगट A+ve. B.Com M.B.A. (Telecommunication Marketing), प्रायव्हेट कंपनीत मार्केटिंग मॅनेजर, मा. प्रा. रु. ६०००, आई-वडील व लहान बहीण, आवडता छंद - क्रिकेट, हॉकी. **अपेक्षा** - नोकरी करणारी, कऱ्हाडे/कोकणस्थ. **संपर्क** - अनिल लक्ष्मण मराठे, ७० ब/४ आलोक, प्रभात रोड १५, सिबायोसिस शाळेजवळ, पुणे ४११००४, फोन : ५६५१३२३.

**क्र. ६६/२००३ वर** - अमोल रत्नाकर ताटके, कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र-काश्यप, जन्म - ५.५.१९७६, उंची - ५'-७'', सुदृढ बांधा, DME. DBM. तोलानी मरीन इंजि. कॉलेज, तळेगांव येथे लॅब इन्स्ट्रक्टर, आई-वडील कोल्हापूरला, १ विवाहित बहीण तळेगावला मुलाला कॉलेजच्या क्वार्टर्स आहेत. **अपेक्षा** - नोकरी करणारी, गृहकृत्यदक्ष, शक्यतो कऱ्हाडे किंवा कोकणस्थ, एकत्र कुटुंबात राहण्यास तयार असलेली. **संपर्क** - पद्माकर गजानन ताटके (काका), प्रसाद पार्क बि. ८४, फ्लॅट नं. ३७, विठ्ठलवाडी, पुणे ४११०५१. फोन : दुकान - ४४५८६६७, घर - ४३५४५५२.

**क्र. ६७/२००३ वर** - राहूल जयंत जोशी, कोब्रा, गोत्र-वत्स, जन्म - १६.७.१९७५, उंची - ५'-९'', गोरा, सुदृढ बांधा, रक्तगट - A+ve. चष्मा आहे, डिप्लोमा इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, MCSE, नोकरी, एशियन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक येथे कॉम्प्युटर इंजिनिअर, मा. प्रा. रु. ८५००, आई-वडील, दोन भाऊ विवाहित. अपेक्षा - उंची ५'-४'' ते ५'-६'', वय २१ ते २५, पदवीधर किंवा डिप्लोमा, नोकरी असल्यास चालेल, शक्यतो चष्मा नको, सुस्वरूप व अनुरूप असावी, पत्रिका पहायची आहे. **संपर्क** - जयंत महादेव जोशी, कुलकर्णी प्लॉटस्, लक्ष्मण भुवन, एजंट टाईम्स ऑफ इंडिया, भुसावळ, जिल्हा जळगांव, फोन : (०२५८२) २२५००२.

**क्र. ६८/२००३ वर** - श्रीपाद प्रकाश गोखले, कोब्रा, गोत्र-काश्यप, जन्म - ५.४.१९७१, उंची - ५'-३'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, रक्तगट A+ve. आई-वडील, एक विवाहित बहीण, छंद वाचन, बी.ए., नोकरी ट्रॅव्हल कंपनी एअर इंडिया - मॅनेजर, मा. प्रा. रु. ६०००. **अपेक्षा** - नोकरी, कोकणस्थ, वय २८ ते ३०, उंची - ५'', मा. प्रा. रु. ३ ते ४ हजार. **संपर्क** - प्रकाश जनार्दन गोखले, १४२४ शुक्रवार पेठ, जोशी वाडा, नवा विष्णु चौक, पुणे ४११०३०, फोन : ४४६७०३९.

**क्र. ६९/२००३ वर** - अभिजित अभय कामतेकर, कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र-अत्रि, जन्म - ३.६.१९७६, उंची - ५'-५'', मंगळ नाही, सावळा, मध्यम बांधा, M.Com., GDCA. MBA. फर्स्ट सेमिस्टर झाले आहे, सह. बँकेत क्लार्क, स्वत:चे दुकान, आई-वडील व एक भाऊ. अपेक्षा - अनुरूप, वयात २ ते ३ वर्षे अंतर असावे, शिक्षण पोस्ट ग्रॅज्युएट असावी, नोकरी असावी, कोणत्याही शाखेची चालेल. **संपर्क** - अभय राजाराम कामतेकर, १०७३ सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन : ४४९२७७१.

**क्र. ७०/२००३ वर** - देवीदास सुरेश केतकर, कोब्रा, गोत्र-गार्ग्य, जन्म - २१.१०.१९७४, उंची - ५'-७ १/२'', गोरा, मध्यम बांधा, रक्तगट A+ve. B.Sc., MCS, नोकरी - प्रोसेस इन्फोटेक, कस्टमर सपोर्ट इंजिनियर, आई-वडील, दोन भाऊ विवाहित, आजी सर्व एकत्र कुटुंबात रहातात. **अपेक्षा** - दिसायला चांगली, नोकरी (३-४ हजार), पत्रिका पहायची आहे. एकत्र कुटुंबात रहाणारी. **संपर्क** - सुरेश महादेव केतकर, सर्व्हे नं. ८१, देव्हारा बंगला, चैत्रबन, टणु शाळेजवळ, विक्रम मेडिकल समोर, नवी सांगवी, पुणे ४११०२७, फोन : ७२८०६१८.

***



Marathe Pratishthan

## या अंकात


१. **थोडा संयम पाळा : केबल दरवाढ टाळा**....... पृ.१
सौ. राधा श्रीकांत मराठे, अंधेरी

२. **स्वातंत्र्यसैनिक प्रभाकर नारायण तृतीय स्मृतिदिन**.. पृ.४
श्रीपाद नारायण मराठे, बेळगांव

३. **आण्णा पुतळीबाईच्या कचाट्यातून वाचले**...... पृ.४
मनोज यशवंत मराठे, पुणे

४. **गीताज्ञान नवनीत** (उत्तरार्ध).................... पृ.५
प्रभाकर सीताराम मराठे, मुंबई

५. **गजाआडचे गुणवान - साचो तेरो नाम**.......... पृ.७
अच्युत महादेव चक्रदेव, पुणे

६. **दत्तक पालक**................................. पृ.८
वसंत रावजी मराठे, खुडीपाट, जि. सिंधुदुर्ग

७. **इको फ्रेंडली वटपौर्णिमा**..................... पृ.९
सौ. राधा श्रीकांत मराठे, अंधेरी

८. **आम्ही पाहिलेले न्यूयॉर्क : वर्ल्ड ट्रेड सेंटरसह**.. पृ.१०
सौ. माधवी श्रीकृष्ण मराठे, गोरेगांव

९. **वार्धक्याविरुद्ध लढा**........................ पृ.१२
डॉ. सौ. सीमा श्याम मराठे, पुणे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **एकमेकां साह्य करूं** (पृ.७), आणि **विवाह सहाय्य** (पृ.१३ ते १५) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan